# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००८ |
| वर्ष | : | नववे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १३१**

MAHMAR/19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष नववे / अंक ८ / जुलै २००८

## संपादकीय

## प्रश्नांची तीव्रता वाढत आहे

हवामानातील वाढती अनिश्चितता, हवामान बदलांतील अनित्यता इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये आहे की भविष्यात काय वाढून ठेवले आहे हे आज कोणीही वर्तवू शकत नाही. पावसाळा अद्याप तरी कोरडाच आहे. पावसाळा असा कोरडा गेला तर येणारा दुष्काळ आपल्या एकूणच अस्तित्वासमोर नवीन आव्हाने निर्माण करणारा ठरणार आहे. लोकसंख्येच्या घनतेमुळे तर ही आव्हाने अधिकाधिक तीव्र होत जातील. या आव्हानांमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या प्रश्नांची झळ आता प्रकर्षाने सामान्य माणसाला पोहचण्यास सुरुवात झाली आहे.

नागरीकरणाचा वेग वाढला तसे नगरांचे आकार विलक्षण सुजत गेले. ही सूज अनियंत्रितपणे चालूच आहे. नगरांचे अस्तित्व ज्या पायाभूत सुविधांवर आधारलेले आहे, ज्या सुविधांचे अस्तित्व आम्ही गृहीतच धरून चाललो आहोत त्या पाणी आणि वीज यांचा पुरवठा खंडित व्हायला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे. या सुविधांचे अपुरेपण, त्यांचे गांभीर्य दिवसे न दिवस वाढत जाईल असे भीतीदायक चित्र आज आहे.


नागरी वसाहतींतील सर्व सेवा उद्योग वीजेवर अवलंबून आहेत. वैद्यक सेवा, शिक्षण सेवा यांपासून दळणाच्या गिरण्यांपर्यंत सर्व काही वीज या एका मूलभूत गरजेवर अवलंबून आहे. पाऊसच पडला नाही तर ही सर्वच क्षेत्रे विलक्षण संकटात सापडण्याची भीती आहे. शेती उद्योगावर होणारे गंभीर परिणाम हा वेगळाच, काळजीचा विषय आहे.

मोठ मोठ्या प्रयोगशाळांतील प्रयोग, लोकशाहीचा एक आधारस्तंभ मानण्यात आलेली अभिव्यक्तीशी संबंधित अशी प्रसार माध्यमे, रेल्वेसारख्या दळणवळणाच्या सेवा या सर्वांचे काय होणार हा प्रश्न तीव्र होत चालला आहे.

वीज वाचवा; पाणी वाचवा, पर्यावरण वाचवा असा टाहो फोडून काही साधेल असे नाही. त्यासाठी बेस कार्यक्रम राबवले जायला हवेत. 'नैसर्गिक आपत्ती' 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून ज्या आपत्तींचा आपण उल्लेख करतो त्या आपत्तींनाही आपल्या कृतीच जबाबदार आहेत. पुढे येऊ शकतील अशा संकटांचा विचार करून कृतियोजना राबवणारे शासन आदर्श शासन ठरते. आज संकटे दार ठोठवायला लागल्यावर आम्ही धावाधाव करतो. असे करणे म्हणजे तहान लागल्यावर विहीर खणण्याइतके निरर्थक आहे.

(पृष्ठ क्रमांक २६ वर)

## स्वप्न साकारत आहे...



हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

वा.भा.बेडेकर

(Cover No. 2)





## वर्ष नववे / अंक ८ / जुलै २००८



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा.. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १३ वे / अंक १ ला)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | सच्चिदानंद बाबा | श्री. शं. बा. मठ | ३ |
| २) | ग्रंथप्रकाशन सोहळा | श्री. सुरेंद्र लागू | ८ |
| ३) | ग्रंथवेडा ग्रंथपाल | श्रीमती आशा भिडे | १२ |
| ४) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १६ |
| ६) | निवृत्तीनंतरच्या जीवनशैलीचे संस्कार तारुण्यातच करून घ्यायला हवेत! | श्री. पुनम सिंगवी | २७ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

प्रति,
संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# सच्चिदानंद बाबा

*ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहून घेणारे लेखनिक सच्चिदानंद बाबा यांच्याबद्दल सांगितली जाणारी ही अद्‌भुत कथा - संपादक*

श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या शेवटी सच्चिदानंद बाबा आदरे। लेखकु जाहला। ही ओवी पाहावयास मिळते. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी सच्चिदानंदबाबाना मृतावस्थेतून उठविले आणि ज्ञानेश्वरीचे लेखक केले, इतकीच सामान्य माहिती अनेकांना ज्ञात आहे. त्यांच्या बद्दलची विशेष माहिती त्यांच्याच कुळातील प्रसिद्ध संत चरित्र लेखक श्री. दा. का. थावरे यांनी अतिशय मेहनतीने अनेक ठिकाणांहून गोळा करून बाबांचे चरित्र लिहिले आहे. आणखी विशेष म्हणजे त्यांचेच वडील श्री. काशीनाथ पंत थावरे यानी जीवनभर श्रद्धेने ज्ञानेश्वरीची उपासना केली व हजारोंना ज्ञानेश्वरीचे वाचक बनवले. यांच्या चिरंजीवामुळे आपल्याला सच्चिदानंद बाबा यांची विशेष माहिती उपलब्ध झाली हे आपले भाग्यच होय.

**<u>नेवासे क्षेत्र</u> :**

नेवासे हे पुण्य क्षेत्र आहे. प्रवरा नदीचे काठी हे गाव वसले आहे. याच क्षेत्री पूर्वी देव आणि दानव यांच्या मध्ये अमृत वाटप झाल्याचा उल्लेख श्रीमत् भागवत अष्टम स्कंधात असल्याचे सांगितले जाते. याच कारणासाठी येथील लोक या प्रवरा नदीला अमृतवाहिनी म्हणतात. नेवासे हे लहान गाव आहे. पूर्वी परगणा होता आज तालुक्याचे ठिकाण आहे. प्रवरा नदीचा प्रवाह वस्तीमधून वाहू लागल्याने त्याचे दोन भाग झाले. नेवासे खुर्द इथे मोहिनीराजाचे मंदिर आहे. तसेच इथेच ज्ञानेश्वरीचा जन्मही झाला. नेवासे बुद्रुक येथे श्री खंडेरायाचे मंदिर आहे. सातशे वर्षापूर्वी या गावी कुलकर्णी नावाचे कुटुंब राहात होते. ते या गावचे कुलकर्णी पण होते. यांचे घराणे सज्जन होते, यांच्या विषयी या गावच्या परिसरात आदर होता. ते सर्वांचे चाहते होते किंबहुना एक आश्रयस्थान होते.

**<u>सच्चिदानंदाचा जन्म</u> :**

शके ११८० ते ११८५ या दरम्यान या कुलकर्णी कुटुंबात एका विश्वविख्यात बालकाचा जन्म झाला. त्याचे सच्चिदानंद असे नाव ठेवण्यात आले. दिवसें दिवस बालक मोठे झाले. गुरू कुळात त्याचे शिक्षण सुरू झाले. मुलगा मोठा झाला. सच्चिदानंद आपल्या वडिलाना मदत करू लागला. तो सेवाभावी, विनयशील, परिश्रमी आणि सदाचरयुक्त होता. त्या गावातील तो सर्वांचाच आवडता तरुण होता. तो रोज मोहिनी मातेचे दर्शन घेई, ध्यानस्थ बसे व प्रार्थना करी. ''महालये महादुर्गे महाघोर पराक्रमे। निवारय महम् दु:खं त्राहीमां कुरूणेश्वरी।'' अशी मोहिनी मातेची करुणा भाकी. गावा बाहेर करवीरेश्वर मंदिर होते, तेथेही बाबा जात असे. शंकराचे ध्यान व नामस्मरण करी. एकांत सेवन बाबाला खूप आवडे.

बाबा आता वीस वर्षाचा झाला. परंपरेने आलेले कुलकर्णीपणाचे काम तो स्वतंत्रपणे पाहू लागला. अडचणीच्या वेळी वडिलांचा सल्ला घेई. अंतरी सतत माधवाचे चिंतन व हाताने काम हा त्याचा स्वभावधर्म बनला. हे सारे करत असताना स्वत:च्या तब्येतीकडे हेळसांड करत असल्याने बाबाला क्षयरोगाने गाठले. औषध उपाय योजना सुरू झाली. क्षयरोग आटोक्यात आला नाही. दिवसें दिवस बाबा खंगत चालला. आई बाप मोठ्या विवंचनेत पडले. त्यांच्या आशेचा चक्काचूर जाला.

**<u>नेवासे परिसरातील घटना :</u>**

नेवाशाच्या जवळच एक लहानसे खेडे होते. तेथे-देखील कुलकर्णी कुटुंब नांदत होते. त्यांना दोन मुले होती. राम अणि लक्ष्मण अशी त्या मुलांची नांवे होती. ही दोनही भावंडे म्हणजे घरचे लेणे व गावचे भूषण होते.

मुले मोठी झाली. रामाला लक्ष्मी नावाची मुलगी सांगून आली. त्याचे लग्न अगदी साधेपणाने झाले. तिचे नाव सीता असे ठेवण्यात आले. तिचा गोड स्वभाव आणि मृदू वागणे यांनी घरात आनंद नांदू लागला. काही दिवसांनी लक्ष्मणाचे लग्न झाले. नववधूचे घरात स्वागत करण्यात आले. तिचे नाव कमल ठेवण्यात आले. कमल अत्यंत अहंकारी, मत्सरी व द्वेष्टी होती. असत्य वागणे व कटु बोलणे यात तिला धन्यता वाटे. कमलचे तोंड म्हणजे साक्षात अग्नीकुंड. लक्ष्मण हा प्रेमळ स्वभावाचा. त्याचा विचार कमलला कधी पटला नाही. तिचे बोलणे साक्षात् काळकुट. तिच्या बोलण्यापुढे अग्नीची दाहकता देखील फिकी पडत असे. सीता ही निर्मळ अंत:करणाची होती. आपल्या गोड वागण्याने घराच्याच काय गावातल्या लोकाना देखील तिने आपलेसे केले. ती त्या गावचे भूषण होती. बायकोच्या दुष्ट वागण्यामुळे लक्ष्मण मात्र दु:खी होता.

काही दिवसानी सीता प्रसूत झाली. तिला सुंदर कन्या रत्न झाले. तिचे नांव विद्युलता आणि सौदामिनी असे ठेवण्यात आले. सौदामिनी आईच्या स्वभावा प्रमाणे गोड व प्रेमळ मुलगी होती. थोड्याच कालावधीनंतर कमल हिला ही कन्या रत्न झाले. कन्येचे नाव विमल ठेवण्यात आले. दोनही कन्यकांमध्ये दीड वर्षाचे अंतर होते. विमल आई प्रमाणेच अत्यंत हट्टी, द्वेष्टी आणि मत्सरी होती. या दोघींची घरात आदळआपट होत असे व सतत कुरबूर चाले. सीता अत्यंत सुस्वभावी, लाघवी आणि प्रेमळ असल्याने या गोष्टीकडे विशेष लक्ष देत नसे. तीच घरातील सर्व कामे करी. कमल आणि विमल दोघी मायलेकी नुसत्या बसून राहात व सीतामाईला नावे ठेवीत.

सतत परिश्रम करीत असल्याने व अन्य काही कारणामुळे सीता आजारी पडली. आजार वाढत गेला. तिने देवाची मनोमन प्रार्थना केली. देवाधिदेवा साऱ्यांचे कल्याण होऊ दे. व परमेश्वराच्या चिंतनातच तिने जगाचा निरोप घेतला. घरच्यांना तसेच गावकऱ्यानाही तिच्या अचानक निधनाने तीव्र दु:ख झाले. गावची माउली गेली असे गावकऱ्याना वाटले. सांत्वनासाठी सारे गाव लोटले. सौदामिनीला आत्यांतिक दु:ख झाले. गावातील म्हातारीने तिचे सांत्वन केले.

रामदादा आधीच विरागी, सीतामाईच्या निधनानंतर तो अधिक वैराग्यशील झाला. तो सर्व काळ एकांतात घालवू लागला. लक्ष्मण घर सांभाळत होता. घरातील कामे सौदामिनी निमूटपणे करीत असे. लक्ष्मण तिला मदत करी. कमल व विमल नुसत्या बसून असत. वेळ प्रसंगी सौदामिनीचा छळ करीत. काही दिवसांनी रामदादा आजारी पडले. त्यांचे नामस्मरण सतत चालू असे. त्याना आता या जगाचा निरोप घेण्याची घाई झाली. ईश्वर चिंतनातच देह पात व्हावा असे त्यांना वाटत होते. कन्ये विषयी काळजी वा चिंता त्यांना स्पर्श करीत नसे. एक दिवस रामदादाने नामस्मरणातच आपला देह श्रीरामचरणी अर्पित केला. लक्ष्मण व सौदामिनी यांच्यावर आकाश कोसळले. गावातील वृद्ध मंडळीनी त्यांचे सांत्वन केले.

आता कमल विमल याना सारे रानच मोकळे झाले. सौदामिनीला रात्रंदिवस त्रास देणे हाच त्यांचा उद्योग बनला. लक्ष्मण एकाकी पडला. असहाय झाला. त्याला सौदामिनीचा होत असलेला छळ पाहावत नसे. कमल व विमल यांची उन्मतता वाढत चालली. सौदामिनीला कमल दिवस दिवस उपाशी ठेवी. सतत तिच्या कडून कामे करून घेई. अशा विपत्तीतही सौदामिनी शांत राहात असे.

अभिमान घालवण्यासाठी गुरुची आवश्यकता आहे.

आता सौदामिनी उपवर झाली. लक्ष्मण तिच्यासाठी स्थळ शोधू लागला. त्याला एक स्थळ पसंत पडले. त्याला आनंद झाला. पत्नीच्या कानी ही बातमी घातली. पत्नीच्या अंगाचा दाह झाला. एवढे चांगले स्थळ विमलसाठीच निश्चित करा. सौदामिनीचे लग्न नंतर करा. लक्ष्मणाने तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ. सौदामिनी बाजूलाच असल्याने तिने हे सारे ऐकले ती काकाकडे आली आणि लक्ष्मण काकाला म्हणाली, काकूच्या मनासारखे घडू द्या. विमलचे कल्याण झाले तर मलाही त्यात आनंद आहे. हे ऐकताच लक्ष्मणाचे अंत:करण द्रवले.

विधिलिखिता प्रमाणे विमलचे लग्न त्या स्थळाशी ठरले. विवाह समारंभ पार पडला. विमल सासरी गेली आता सौदामिनी एकटीच राहिली. तिचा छळ वाढत चालला. तिला मरणप्राय यातना देण्यावाचून कमलला दुसरा उद्योगच नव्हता. लक्ष्मण हे पाहून खचत होता. कमलचा दुष्ट विचार आणखी प्रबळ झाला. तिचे सौदामिनीसाठी एक स्थळ हुडकले. नेवाश्याच्या कुलकर्ण्याचा मुलगा. अंदाजे २२/२५ वर्षाचा असावा. मात्र तो समंजस व सदाचारी होता. तो क्षयी होता. मत्सराने ह्या मुलाशी सौदामिनीचे लग्न लावावयाचे असे कमलने ठरविले. लक्ष्मणाला ही गोष्ट सांगितली. तिच्यापुढे त्याचे काही चालले नाही. लक्ष्मण कमलच्या सांगण्याप्रमाणे नेवाश्यास आला. मुलाच्या वडिलाकडे लग्नाची बोलणी केली. मुलाच्या वडिलांनी आपला मुलगा क्षयी आहे असे सांगितले. कमलच्या मर्जी विरूद्ध जाण्याची हिंमत नसल्याने या क्षयी स्थळाशी सौदामिनीचे लग्न निश्चित केले.

एका चांगल्या मुहूर्तावर विवाह समारंभ पार पडला. या नव दांपत्याने मोहिनी मातेचे व कपिलेश्वराचे दर्शन घेतले. संसार सुरू झाला. सौदामिनी मनोमन आनंदली. ती अतिथी अभ्यागताची सेवा करी. पतीची योग्य देखभाल करी. सासू सासऱ्यांची गोड वर्तुणुकीने मर्जी संपादन केली. पतीपत्नी रोज मोहिनी मातेच्या दर्शनास जात. काही दिवसांनी ती गर्भवती झाली व योग्य वेळी तिला कन्यारत्न झाले.

सच्चिदानंदांचे आईबाबा थकत चालले. यथाकाळी त्यांनी या जगाचा निरोप घेतला. सच्चिदानंद बाबांना मातृ पितृ वियागाचे अतीव दु:ख झाले. त्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाला. दिवसें दिवस आजार बळावत चालला.

इकडे विमल सासरी देखील तुसडेपणाने वागत राहिली. तिला सासर पारखे झाले. लक्ष्मण काका व काकू यांची परिस्थिती बिकट झाली. त्यात विमलची भर. ही मंडळी अन्नाला मोताद झाली. लक्ष्मण काकांनी सौदामिनीकडे यावयाचे ठरविले. ती सारी मंडळी नेवाशाला आली. सच्चिदानंदबाबानी त्यांना जवळ केले. याही स्थितीत कमल आणि विमल यांच्या स्वभावात काहीच बदल झालेला नव्हता. तिच्याच घरी सौदामिनीला छळण्याचा सपाटा चालविला.

आता सच्चिदानंदाच्या दुखण्याने उचल खाल्ली आणि एख दिवस सूर्योदयी सौदामिनीचा सौभाग्य सूर्य अस्त पावला. सौदामिनीला अतीव दु:ख झाले. सच्चिदानंदबाबा गेल्याची वार्ता कळताच गावातले लोक जमा झाले. त्यांनी बाबांच्या महायात्रेची तयारी केली. सौदामिनीने पति देवते बरोबर सती जात असल्याचे जाहीर केले. ती धीराची बाई असल्याचे तेथील लोकाना ठाऊक होते. खरे प्रेम भोगात नसून ते आत्मतत्वात असते हे तिला माहीत होते.

तिने भाळ प्रदेशी कुंकवाचा मळवट भरला. हिरवी साडी नेसली, हिरवे चुडे धारण केले व महायात्रेत सामील होण्यासाठी सर्व मंडळी बरोबर निघाली. आपली आई निघाल्याचे पाहून तिची लहान मुलगी म्हणाली, आई मलाही तुझ्या बरोबर घेऊन चल. हा अतिशय करूण प्रसंग होता. सौदामिनी क्षणभर स्तब्ध झाली. इतक्यात कमलने त्या पोरीला खसकन् ओढले व म्हणाली, कारटे कुठे मसणात चाललीस? सौदामिनी याही क्षणी शांत होती. ती मुलीला म्हणाली, कमला माते कडे जा. कन्येची मिठी सोडवत

ती स्मशानाच्या दिशेने चालू लागली.

सौदामिनी मातेला सारे दंडवत घालू लागले. दुपार टळत होती. याच सुमारास ज्ञानदेव आपल्या भावंडासह पैठणहून नेवाशी येवून पोचले. प्रवरानदी काठी उतरले. समोर कोणी सत्पुरुष वृक्षा खाली बसले आहेत त्यांचे दर्शन घेऊन ये असे सौदामिनी मातेस कुणीतरी सुचविले. साधु संतांबद्दल तिला आदर होताच ती त्या वृक्षाजवळ आली व ज्ञानदेवांना साष्टांग दंडवत घातले. ज्ञानदेवांच्या मुखातून अखंडवाणी बाहेर पडली, ''सौभाग्यवती भव.'' दंडवत पूर्ण करून सौदामिनी हात जोडून उभी राहिली आणि म्हणाली, देवाधिदेवा मी सती जात आहे. आपला आशीर्वाद पुढील जन्मी फळाला आला तरी मी स्वत:ला भाग्यवती समजेन. ज्ञानदेवांच्या नयनातून अश्रु उभे राहिले. तुझ्या दैवताचे नाव काय म्हणून तिला विचारले असता सच्चिदानंद असे ती म्हणाली. सत् चित् आनंदाला मरण माहीत नाही असे ज्ञानदेव म्हणाले.

ज्ञानदेवानी निवृत्तीनाथाना वंदन केले व त्या मातेस म्हणाले, चल तुझ्या दैवताकडे. ते बाबांच्या तिरडीजवळ तिच्या बरोबर आले. त्या प्रेतरूपी सच्चिदानंदाला म्हणाले, उठ सच्चिदानंदा टाकून घोर निद्रेस । वेदा करी न खोटे । ठायी न च संभवे तुझा नाश । (दास गणु) असे म्हणून प्रेतावर प्रवरेचे जल हाती घेऊन शिंपडले. सच्चिदानंद बाबा जाग यावी असे उठून बसले. सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. सौदामिनी मातेने ज्ञानदेवांच्या पायावर लोळण घेतली. सच्चिदानंद उठले व त्यानी ज्ञानदेवांना दंडवत घातले आणि म्हणाले, गुरु देवा माझ्या कांतेची विनवणी ऐकून तुम्ही मला सजीव का केले? निवृत्तीनाथ म्हणाले अरे सच्चिदानंदा तुझी व तुझ्या कांतेची पुण्याई जबरदस्त, म्हणूनच असे घडले. बाबा म्हणाले ज्ञानदेवा तिकडे स्वर्गात माझ्या सत्काराची तयारी झाली होती. मोठी गर्दी झाली होती. रथातून माझी मिरवणूक निघणार होती. रथात मला बसवीत होते, येवढ्यात आपली हाक येताच त्यानी मला खाली ढकलले. तो मी आता आपल्या पुढ्यात आहे. ज्ञानदेव म्हणाले बाबा आपल्याला फार मोठे कार्य या जगात करावयाचे आहे. बाबा ते वैकुंठच आपण भूतळी आणू.

ज्ञानदेवांनी सच्चिदानंदबाबाना सजीव केले ही घटनाच अलौकिक आणि असामान्य होती. ही वार्ता थोड्याच वेळात गावभर पसरली. ज्ञानदेवासह सारी मंडळी गावानजिक असलेल्या विश्वेश्वर महादेवाच्या (कपिलेश्वर) देवायलयात आली. तिथे निवृत्तीनाथांना वंदन करून ज्ञानदेव खांबाला टेकून बसले आणि ज्ञानेश्वरीचा प्रारंभ करावयाचे ठरविले. समोर सच्चिदानंदबाबा लेखन साहित्यासह लिखाणासाठी सज्ज झाले. इतक्यात सौदामिनी आली तिने सर्वाना दंडवत घातले. ज्ञानदेव म्हणाले देवी सच्चिदानंद बाबा आता इथेच राहातील. घरी येणार नाहीत. ती म्हणाली, देवा माझी संमती आहे मात्र सकाळ संध्याकाळ मला इथे सेवा करण्यास परवानगी असावी. तशी परवानगी तिला देण्यात आली. तिला आनंद झाला.

<u>ज्ञानदेवांनी ग्रंथारंभ केला</u> :

ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।<br>
जय जय स्व संवेद्या । आत्मरुपा ॥ १॥

हा वाक्‌यज्ञ अनेक दिवस चालू होता. निवृत्तिनाथ यांच्या उपस्थितीत हा यज्ञ संपन्न होत होता. गुरुदेवाना शिष्यानी ज्ञान कथन करावे असे जगद् विख्यात कार्य नेवाश्याला आकार घेत होते.

रोज दुपारी व रात्री सौदामिनी जेवण आणीत असे. ती सर्वाना जेऊ घाली. ग्रंथ समाप्ती जवळ येत चालली व खालील दिवशी ग्रंथ समाप्त झाला.

पुढती पुढती । इया ग्रंथ पुण्य संपत्ति ।<br>
सर्व सुखी सर्वांभूती । संपूर्ण होईजे ।

शके बाराशते बाहात्तरे। तै टीका केली ज्ञानेश्वरे।

सच्चिदानंद बाबा आदरे । लेखकु झाला।

अध्याय (१८-१८०९)

वाक् यज्ञ संपवून ज्ञानदेव आदी मंडळी आळंदीला निघाली. सौदामिनी मातेने देह कुठे विसर्जित केला. बाबांनी आपला देह देवापाशी कधी अर्पण केला या संबंधीची नोंद काळाने गडप केल्याने उपलब्ध होत नाही. अशी ही सच्चिदानंद बाबांची कथा. अत्यंत परिश्रम पूर्वक माहिती गोळा करून श्री. दा.का. थावरे यांनी ही कथा उपलब्ध केली आहे. संशोधनाच्या निकषावर ही टिकणारी नाही. याची कल्पना कथा लेखकाला पूर्ण आहे. आपल्या वंशातील एक गौरवाचे स्थान म्हणूनच श्री. थावरे यानी ही कथा रचिली आहे.

बाबांचे काही लिखाण उपलब्ध झाल्याने त्याचाही उल्लेख श्री. थावरे यानी या कथेच्या शेवटी केलेला आहे.

**बाबांची वाणी :**

स्नान संध्या न घडे एका ।
तयासि कर्म अति जड देखा ।
ते जीव उद्धरले उद्धरले ।
ज्ञानदेवी मुक्त केले ।
सच्चिदानंद बाबा साचा ।
त्यासी प्रसाद ज्ञान देवाचा ।

**एक अभंग :**

परब्रह्माचल शिखरी । प्रगट गीता ज्ञानेश्वरी ।
गीता गंभीर गंगा । ज्ञानदेवी प्रगट जगा ।
तिही ठायी वक्रवाहे । पूर्व परा जात आहे ।
श्लोक सातशते । ओघ चालला कौतुके ।
सच्चिदानंद बाबा सिंधु । जंगम झाला सोऽहं बोधु ।

सच्चिदानंद बाबाच्या पर्यंत आलेला हा नाथ संकेताचा दंशु सोहं बोधाने सच्चिदानंद मय होऊन कृतार्थ झाले.

अशी आहे सच्चिदानंद बाबांची पुण्यपावन जीवन गंगा. ह्यांच्या चरणी ज्ञानदेवासह सर्व भावे दंडवत.

**शं. बा. मठ**

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

●●●

**जगातील आदिवासी जमाती**

| | | |
|---|---|---|
| माओरी | - | न्यूझीलंडमधील आदिवासी |
| कुर्द | - | टर्की 'इराण' इराकमधील आदिवासी |
| होटॅन्टो | - | नैर्ऋत्य आफ्रिकेतील आदिवासी |
| सहारिया | - | राजस्थान (भारत) मधील आदिवासी |
| फ्लेमिंगो | - | बेल्जिअममधील आदिवासी |
| फिलिपिनोज | - | फिलिपाईन्समधील आदिवासी |
| गरासीया | - | भारता (राजस्थान) मधील आदिवासी |
| एस्किमो | - | ग्रीनलॅंड, टुंड्रा प्रदेशातील आदिवासी |
| कोझॅक | - | पोलंड - युक्रेनमधील आदिवासी |
| बोअर | - | टान्सवाल - आफ्रिकेतील आदिवासी |
| गाऊचो | - | उरूग्वे, अर्जेंटिनाचे आदिवासी |
| किकुयू | - | केनियातील आदिवासी |

तुमचे जेथे समाधान झाले त्याला गुरू समजा.

# ग्रंथ प्रकाशन सोहळा

*'वैदिक आह्निक' या ग्रंथाच्या गडकरी रंगायतन येथे झालेल्या प्रकाशन सोहळ्याचा अनुभव सांगणारे हे पत्र आहे. अलीकडे प्रकाशित झालेल्या ग्रंथांमध्ये हा एक महत्त्वाचा ग्रंथ मानण्यात येतो - संपादक*

मान. श्री. बाळासाहेब आपटे

मान. श्री. रामचंद्र आपटे यांस,

सस्नेह नमस्कार,

**ग्रंथ प्रकाशन सोहळा - अभिनंदन !**

प्रथमत: ग्रंथ प्रकाशन सोहळ्याप्रसंगी आपण केलेल्या निमंत्रणामुळे आम्हा उभयतांना उपस्थित राहण्याची संधि मिळाली त्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद !

ग्रंथराज ''वैदिक आह्निक'' ग्रंथाचा प्रकाशन सोहळा ३० मार्च २००८ रोजी संपन्न झाल्याला बऱ्याच दिवसांचा कालावधी होऊन गेला आहे. या विषयीच्या माझ्या भावना समारंभ संपल्यानंतर आपणापाशी मी व्यक्त केल्या आहेतच. परंतु सोहळ्याची आठवण चिरंतन रहावी, या जाणिवेतून हा पत्रप्रपंच. "Better late than Never" या न्यायाने आपण समजून घ्याल अशी आशा आहे.

सदरहू ग्रंथ प्रकाशित करून कनिष्ठ बंधू आणि पुत्र या नात्याने श्री. भाऊंविषयी असलेली कृतज्ञतेची, आपुलकीची स्नेहभावना व्यक्त करून अल्प प्रमाणात का होईना उतराई होण्याचा आपण उभयतांनी प्रामाणिक प्रयत्न केला आहे याबद्दल आपणाला मन:पूर्वक धन्यवाद ! आजच्या स्वार्थी, संघर्षाच्या आणि आत्मकेंद्रित समाजव्यवस्थेत अशी उदाहरणे अभावानेच आढळतील. या सोहळ्याच्या निमित्ताने आपटे कुटुंबीयांची गौरवशाली परंपरा, संस्कारांची शिदोरी, बुद्धिमता आणि सामाजिक बांधीलकीची असलेली जाणीव लक्षात येते.

**श्री. मनोहर जोशींचे विचार :**

''आजपर्यंत कविता, कथा संग्रह, कादंबरी, आत्मचरित्र या आणि अशा सारख्या विविध वाङमय प्रकारांतील अनेक पुस्तक प्रकाशन सोहळ्या प्रसंगी प्रमुख अतिथी वा अन्य भूमिकेत मी उपस्थित राहिलो आहे. परंतु आजचा हा प्रकाशन सोहळा एका आध्यात्मिक विषयावरील निर्मित, संपादित केलेल्या ग्रंथाचा असून देखील एक अविस्मरणीय, अभूतपूर्व आणि अलौकिक सोहळा आहे. भारतीय लोकनेते आदरणीय डॉ. मुरली मनोहर जोशी, माजी केंद्रीय मंत्री मानव संसाधन विकास विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि नगर विकास यांच्या सारख्या उच्च विद्या विभूषित मान्यवरांचे शुभहस्ते तो संपन्न होत आहे आणि या प्रसंगी मला उपस्थित राहण्याचे भाग्य मिळत आहे. याबद्दल स्वत:ला मी धन्य समजतो. माझ्या आयुष्यांतील एकमेवद्वितीय असा हा योग आहे अशी माझी धारणा आहे. प्रत्येक पुस्तक प्रकाशन सोहळ्याप्रसंगी मी असं म्हणतो असं कृपया कुणी समजू नये. आज मी खरोखरच मनापासून आणि जाणिवपूर्वक असं विधान करीत आहे.'' अशा भावपूर्ण आणि अर्थपूर्ण शब्दांत महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, लोकसभेचे भूतपूर्व अध्यक्ष, शिवसेनेचे ज्येष्ठ व श्रेष्ठ नेते खासदार प्राचार्य मनोहर जोशी यांनी आपल्या भावना भाषणातून व्यक्त केल्या. माझे लेखी श्री. मनोहर जोशी यांनी व्यक्त केलेल्या भावना केवळ प्रातिनिधिक स्वरुपात नसून सभागृहांतील बहुतांश उपस्थितांच्या भावना अशाच होत्या हे मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो. कारण अनेकांना असं बोलताना मी ऐकलं आहे, पाहिलं आणि अनुभवलंही आहे. श्री. मनोहर जोशी यांचे

हे विचार एकूणच ग्रंथ प्रकाशन सोहळ्याविषयी सारं काही सांगून जातात.

ज्ञानेश्वरी, भागवत, गाथा, दासबोध या आणि अशा सारखे संतश्रेष्ठींचे ग्रंथ मराठी भाषेचे अलंकार असून ते आपले सांस्कृतिक संचित आहे. मराठीचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येक सारस्वतांनी संग्रही ठेवावेत असेच ते आहेत. आणि त्याच परंपरेतील ''वैदिक आह्निक'' हा ग्रंथराज आहे. डॉक्टरांसारख्या ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, वयोवृद्ध, आदरणीय आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व लाभलेल्या व्यासंगी व्यक्तीने निर्मित, संपादित आणि संकलित केलेला हा ग्रंथ आहे. श्री समर्थ सेवक मंडळाच्या श्रीरामदासनवमी उत्सवामुळे, येऊर येथील सदगुरू सेवाआश्रमामुळे आणि अन्य संस्थांच्या कार्यक्रमाचे निमित्ताने डॉक्टरांचा आणि माझा सुमारे पंधरा-वीस वर्षांपूर्वी संबंध आला. ओळखीचं रूपांतर परिचयात कधी झालं ते कळलेच नाही. भाऊंविषयी माझे मनात नेहमीच आदरयुक्त स्नेहभावना आहे. त्यांच्या भेटीला गेलो की ''या नमोनम: काय हुकुम आहे, काय सेवा आहे'' असं भाऊ स्वागत करतात. भाऊंशी संवाद साधताना, त्यांचे विचार ऐकताना वेद, उपनिषद गीता या आणि अशा सारख्या अन्य कोणत्याही ग्रंथाबद्दल त्यांचा अधिकार किती मोठा आहे याची जाणीव होते आणि आपण आपोआप विनम्र होतो. अफाट स्मरणशक्ती आणि विद्वता यांची डॉक्टरांना दैवी देणगीच लाभली आहे असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही.

व्यक्तीच्या जीवनात एखादी घटना, एखादा कार्यक्रम अथवा सोहळा चिरंतन स्मरणात राहतो. ''वैदिक आह्निक'' ग्रंथाचा प्रकाशन सोहळा हा त्यांतील एक आहे. अनेकविध कारणांसाठी आणि त्यांतील वैशिष्ट्यांमुळे तो नुसता आवडला, नव्हे तर मनाला भावला.

प्रथमदर्शनी प्रवेशद्वाराशेजारी काढलेली सुंदर रांगोळी सर्वांना आकर्षित करीत होती. केशरयुक्त वसंतपेय आणि पेढ्यांनी, आलेल्या प्रत्येक निमंत्रितांचं स्वागत केलं जात होतं.

साधी, सुटसुटीत आणि मनोवेधक रंगसंगतीची, आकर्षक सजावटीची गुळगुळीत कार्डबोर्ड पद्धतीची निमंत्रण पत्रिका मनाला विलक्षण भावली. पत्रिकेतील डॉक्टरांनी केलेलं काव्य वाचून प्रथम मला वाटले ती ज्ञानेश्वरींतील एखादी ओवीच आहे. आमंत्रण पत्रिकेतील मजकुरावर नजर टाकली तर जाणवलं की ''ईदम् न मम'' न्यायाने हा माझ्या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा नसून ''लोकार्पण सोहळा'' आहे. केवढी उदात्त भावना आहे या मागे. कार्यक्रमास महर्षी वेद व्यास आणि जगत्गुरू आद्य शंकराचार्यांचे वरदहस्त आहेत; हे सर्व वाचल्यावर मी भारावून गेलो आणि आपणासारख्या मान्यवरांच्या स्वाक्षरीने सर्वांना निमंत्रित केले आहे हे पाहिल्यावर प्रकाशन सोहळ्याप्रसंगी आम्ही उभयतांनी उपस्थित राहण्याचे निश्चित ठरविले.

अन्य ठिकाणी समारंभाला प्रमुख पाहुणे, अध्यक्ष अथवा उत्तम वक्ते म्हणून ज्यांना नेहमी निमंत्रित केले जाते असे मान. श्री. विनयजी सहस्त्रबुद्धे कार्यक्रमाचे सूत्र संचालन करणार आहेत हे समजल्यावर प्रकाशन सोहळ्याची उंची आणि सधनता काय असेल याची कल्पना आली आणि प्रत्यक्षात तसच घडलं. डॉक्टरांची जनमानसात असलेली प्रतिमा, ओळख आणि विविध सामाजिक संस्थांमधून ते करीत असलेले कार्य, त्याचबरोबर आपणासारखे ख्यातनाम कायदेतज्ज्ञ आणि ''स्वयंसेवक'' समारंभाचे निमंत्रक असल्याने गडकरी रंगायतनचे सभागृह चाहत्यांनी, सुहृदांनी पूर्णपणे भरले होते. इतकेच नव्हे तर आसन व्यवस्थेच्या दोन्ही बाजूंनी प्रेक्षकांचा विशिष्ट 'क्लास' होता. ठीक पावणे अकरा वाजता सुरू झालेला समारंभ दुपारी सव्वादोन वाजेपर्यंत चालू होता. साडेतीन तास श्रोते जागेवरून हलले नाहीत. यातच कार्यक्रमाची यशस्विता आणि संयोजन कौशल्य लक्षात येते.

विनयजींनी व्यासपीठावरील उत्सवमूर्ती, प्रमुख अतिथी आणि सर्व मान्यवर तसेच सभागृहातील उपस्थितांचे स्वागत केल्यावर भारतीय उज्ज्वल परंपरेनुसार मान्यवरांचे शुभहस्ते तसेच दीप प्रज्ज्वलन आणि गायत्री पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ज्येष्ठ गुरुजन सर्वश्री तट्टू, जनुभाऊ जोग, विश्वनाथ जोशी, श्रीपाद जोशी या आणि अशा सारख्या वेदमूर्तींनी डॉक्टरांना वैदिक आशीर्वचन दिले. भाऊंच्या मार्गदर्शनाखाली आणि अधिपत्याखाली शिक्षण घेत असलेल्या महिला शिष्य पुरोहितांनी शिवसंकल्प सूक्ताचे संस्कृतमध्ये पठण करून भाऊंना अभिवादन केले. जोग गुरूजींनी अत्यंत समय सूचकतेने पसायदानाचे चालीवर डॉक्टरांना ''आरोग्यदान'' या संग्रहीत काव्यातून दीर्घ आयुरारोग्य चिंतीले. वेदमंत्राच्या उद्घोषांनी संपूर्ण सभागृहाचे वातावरण मंगलमय, पवित्र आणि प्रसन्न झाले होते. सोहळ्याचे यजमान या भूमिकेतून खासदार मान. श्री. बाळासाहेब आपटे यांनी अत्यंत भावपूर्ण शब्दात केलेल्या प्रास्तविकात पिढ्यान् पिढ्या प्राप्त झालेल्या संस्कार आणि शिकवणूकीतून हा सर्व समावेशक ग्रंथ निर्माण झाल्याचे सांगितले. वेद हे चिरंतन व अमर असून अनुभवजन्य ज्ञान देणाऱ्या या व अशासारख्या ग्रंथांच्या आधारे सदरहू ग्रंथाची निर्मिती झाली आहे. मी केवळ निमित्तमात्र असून करता करविता ''तो'' आहे. अशा शब्दात वेद, उपनिषद, अन्य संस्कृत ग्रंथ यांच्या विषयीची कृतज्ञतेची भावना आणि परमेश्वरावरील श्रद्धाभाव डॉक्टरांनी नम्रपणे व्यक्त केला. ग्रंथ निर्मिती प्रक्रियेत ज्यांचं अत्यंत मोलाचं योगदान आहे, अशा व्यासपीठावरील मान्यवरांपैकी डॉ. श्री. म. भातखंडे, बाळासाहेब मोकाशी, डॉ. उमा वैद्य, डॉ. नलिनी चाफेकर यांनी या ग्रंथा विषयीचे आपले मनोगत संवादांतून व्यक्त केलं. अर्थात त्यांना बोलतं केल विनयजींनी. प्रत्यक्ष ग्रंथ प्रकाशन सोहळा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण, नाट्यमय रीतीने आणि कल्पक पद्धतीने संपन्न झाला. त्याचे वर्णन करता येणे कठीण आहे. याचा अनुभव ज्यांनी घेतला आहे तेच समजू शकतील. याची संकल्पना आणि मांडणी आर्ट डायरेक्टर श्री. मोकाशी यांची होती. व्यासपीठावरील प्रमुख अतिथी, मान्यवर आणि गुरूजनांचा यथोचित गौरव व सत्कार करण्यात आला.

**श्री. मुरली मनोहर जोशींचे विचार :**

आपल्या अध्यक्षीय भाषणात ''वेदांमध्ये केवळ कर्मकांड नसून त्यामध्ये विज्ञानही आहे. कर्मकांडांमध्ये कोणताही मागासलेपणा नाही या उलट 'मॉडर्निटीचे' प्रतीक आहे, विचारपूर्वक ठरविण्यात आलेली ती शास्त्रोक्त नियमपद्धती असून आपल्या समाजाची ती खरी ओळख आहे.'' 'वेदांचे अध्ययन करण्याचा अधिकार सर्व जातीवर्णांना असून महिलांनाही तो अधिकार देण्यात आला आहे. या ग्रंथावरून त्याची प्रचिती येईल. त्या दृष्टीने उपेक्षितांना सशक्त करणारा हा ग्रंथ आहे' असे प्रशस्तिपत्रक डॉ. मुरली मनोहर जोशी यांनी दिले.'' वैदिक कर्मकांडांमध्ये स्वच्छता, आरोग्य विज्ञान, पर्यावरण या सर्व अंगांचा विचार करण्यात आला आहे. या ग्रंथावरून त्याची प्रचिती येईल.'' असे विचार डॉ. मुरली मनोहर जोशी यांनी मांडले. दैनंदिन व्यवहारांतील अनेक उदाहरणे देऊन डॉक्टर जोशी यांनी ती पटवून दिली. समारंभाचे प्रमुख अतिथी आणि आकर्षण असलेले डॉ. मुरली मनोहर जोशी यांचे अत्यंत परखड व मौलिक विचार श्रोत्यांना अंतर्मुख करणारे होते. रसिकांची ते दाद घेऊन गेले. शब्द जंजाळात न अडकता अत्यंत मोजक्या आणि शैलीदार शब्दात प्रकाशन सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आणि ग्रंथ निर्मिती प्रक्रियेत ज्यांचे मोलाचं योगदान लाभलं त्यांच्या विषयीची कृतज्ञता आपल्या आभार प्रदर्शनातून आपण व्यक्त केलीत. पूर्ण वन्देमातरम च्या राष्ट्रगीताने प्रकाशन सोहळ्याची सांगता झाली.

सौ. उर्मिला बळवंत आपटे, सौ. अनुराधा रामचंद्र आपटे आणि आपटे कुटुंबीय यांचे बहुमोल सहकार्य आणि

सहभाग प्रकाशन सोहळ्याच्या एकूणच प्रक्रियेत प्रामुख्याने होता. त्यांना धन्यवाद !

पत्र लांबले आहे याची जाणीव आहे. परंतु वरील सर्व विचार फोनवरून सांगणं कठीण होतं आणि त्या दृष्टीने मनांतील भावना व्यक्त करण्याचं पत्र हे एक उत्तम माध्यम आहे. असो.

सदरहू ग्रंथ हा केवळ वाचण्याचा नसून तो अभ्यासण्याचा ग्रंथ आहे. जगण्याचा प्रकार कोणता, धर्म शास्त्रात काय सांगितले आहे, हिंदुत्वाची वकिली कशी करावी याचे उत्तर या ग्रंथातून मिळते. या ग्रंथाची निर्मिती अन्य भाषांतूनही करण्याची गरज आहे. मान. मनोहर जोशींचे हे विचार या ग्रंथराजाविषयी सारं काही सांगून जातात. अशीच ग्रंथ निर्मिती, समाज प्रबोधन, समाजसेवा आणि रुग्णसेवा डॉक्टरांच्या हातून होण्यासाठी आदरणीय भाऊंना दीर्घ आयुरारोग्य चिंतितो.

आपला स्नेहांकित

**श्री. सुरेन्द्र चिंतामण लागू**

२/ यमुना निवास,
गोविंद बाच्चाजी रोड,
चरई, ठाणे - ४०० ६०१
दूरध्वनी - २५३४९३४१

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**२५४२६२७०**

**जगातील आदिवासी जमाती**

| | | |
|---|---|---|
| लेपच्या | - | सिक्कीम व दार्जिलिंगमधील वन्य संपत्ती गोळा करणारी पहाडी जमात |
| खासी | - | आसाम मधील खासी आणि जैतिया डोंगराळ भागात राहणारी वन्य जमात |
| झुलू | - | दक्षिण आफ्रिकेतील वन्य जमात |
| तोंडा | - | निलगिरी पर्वतातील आद्य निवासी |
| टार्टर | - | सैबिरीया, तुर्कस्थान प्रदेशातील वन्य जमात |
| शेर्पा | - | तिबेट आणि नेपाळ मधील डोंगराळ भागात राहणारी वन्य जमात |
| ब्लॅक फॅलोज | - | ऑस्ट्रेलियातील आदिवासी |
| संथाळ | - | पश्चिम बंगालमधील आदिवासी |
| नागा | - | नागालॅण्डमधील आदिवासी |
| मोपला | - | केरळमधील आदिवासी |
| बदाऊनी | - | अरबस्तान उत्तर आफ्रिकेतील आदिवासी |
| बोरो | - | ॲमेझॉन खोऱ्यातील आदिवासी |
| हौसा | - | नायजेरियातील आदिवासी |
| मसर्लू | - | केनियातील आदिवासी |
| रेड इंडियन | - | उत्तर अमेरिकेतील आदिवासी |
| किरगिझ | - | मध्ये आशियातील आदिवासी |
| लॅप | - | उत्तर फिनलंडमधील आदिवासी |
| सॅमॉइड | - | सैबेरियातील आदिवासी |
| चकमा | - | भारत (आसामातील आदिवासी) |
| मुग | - | भारतातील आदिवासी |
| काथीज | - | सौराष्ट्रातील आदिवासी (भारत) |
| मसाई | - | पूर्व आफ्रिकेतील आदिवासी |
| बुशमेन | - | कलहरी वाळवंट - दक्षिण आफ्रितेतील आदिवासी |
| तुएरेग | - | सहारा अरबस्तान वाळवंटातील आदिवासी |
| पिग्मी | - | कांगो (झैरे) खोऱ्यातील आदिवासी |

# ग्रंथवेडा ग्रंथपाल

## श्री. नारायण काळे

*राहत्या सोसायटीत ग्रंथालय चालवणारे श्री. नारायण काळे यांच्या ग्रंथ प्रवासाची ही ओळख - संपादक*

टी.व्ही. मुळे वाचन ही गोष्ट आजकाल दुर्मिळच काय नष्ट होत चाललीय. लहान मोठ्या सर्वांनाच त्या इडियट बॉक्सने भुरळ घातलीय. मुद्दाम पुस्तक विकत घेऊन वाचणं सोडाच पण वाचनालयातून चांगली चांगली पुस्तकं आणून वाचायलाही त्या टी. व्ही. पुढे कुणाला वेळ नाहीये. त्यामुळे, वाचण्याची आवडच नष्ट होत चाललीये की काय कोणास ठाऊक असे वाटायला लागते.

पण ती वाचनाची आवड मरू न देता तिला जगवावी, या दुर्दम्य इच्छेनं एक माणूस झपाटला आणि त्या स्वत: ग्रंथवेड्या असलेल्या माणसानं स्वत: च्या सोसायटीत चक्क एक वाचनालय काढलंय. १९७४ पासून आपली नोकरी सांभाळून त्या वाचनालयाची धुरा त्यानं समर्थपणे आपल्या खांद्यावर पेललीय. एक खांबी तंबूच म्हणाना. घरातल्या कोणी मदत केली तरी त्यांच्या शिस्तीत ते बसत नाही. स्वत:ची वैयक्तिक कामं बाजूला ठेऊन ते सोमवार आणि गुरुवार संध्याकाळी ७ ते ८॥ हा वेळ वाचनालयाला देतात. शनि, रवि, सुट्टीत ते मॅजेस्टिक मधून सवलतीच्या दराने पुस्तकं खरेदी करून आणतात. त्यांवर वाचनालयाचा स्टँप मारून त्यांना सुरेख पारदर्शक कव्हर्स घालतात. सुरुवातीला वर्तमानपत्राची कव्हर्सही घालत असत. पुस्तकांची खरेदी ते अतिशय चोखंदळपणे करतात. अगदी माफक वर्गणीत ते वाचकांना हवी तेवढी पुस्तकं घेऊन जा म्हणतात. 'घेता किती घेशील दो कराने' अशी किंवा 'देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी' अशी वाचकांची स्थिती होते.

१९८८ साली ठाण्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झालं त्यावेळे प्रा. वसंत कानेटकरांनी एक मोलाचा विचार मांडला. सुसंस्कृत माणसांच्या वसाहतीत ग्रंथालयं असायला हवीत हा. लोकांची ज्ञान जिज्ञासा, वाचन पिपासा शमवणारी. पण, त्या आधीच १४ वर्षे श्री. काळे यांनी ती कल्पना कृतीत आणली होती. आपल्या ठाणे येथील पाचपाखाडी विभागातील प्रदीप सोसायटीत सहकारी तत्त्वावर वाचनालय काढून.

श्री. नारायण काळे हे व्यवसायाने आर्किटेक्ट आहेत. भाभा अनुशक्ती केंद्रात ते उच्च पदाधिकारी होते. त्यांचे वाचनवेड बालपणापासूनच. ''बालवयात वि. वा. इडप, बाबूराव अर्नाळकर यांच्या रहस्य कथा वाचायला आवडत. धनंजय, छोटू, झुंजार कथा वगैरे. पुढे ना. सी. फडके, खांडेकर, हरि नारायण आपटे आवडू लागले. पुस्तकं विकत घेऊन वाचण्याची परिस्थिती नव्हती. त्यावेळी गिरगावात आमच्या शेजारी धाक्रस म्हणून साहित्यप्रेमी रहात. ते नवशक्तीत कामाला होते. मल ते चांगली चांगली पुस्तकं वाचायला आणून द्यायचे. त्यांच्याशी मी वाचलेल्या पुस्तकाबद्दल चर्चाही करायचो. पुस्तके नुसती वाचून उपयोग नाही त्यावर चर्चा केली पाहिजे असं त्यांचं मत होतं. गिरगावात भोवताली साहित्यिक अड्डे असायचे. मौज प्रकाशन, प्रार्थना समाज, साहित्य संघ वगैरे ठिकाणी. मी झावबाच्या वाडीत रहाणारा. आम्ही म्हणजे धाक्रस व मी गणपतीत त्यावेळी गडकऱ्यांची नाटकं बसवायचो, भाग देखील घ्यायचो. पु. ल. देशपांडे, जयवंत दळवी, श्री. ना. पेंडसे यांची कितीतरी पुस्तकं वाचली मी त्या वयात 'काळे सांगतात', पेंडश्याच्या 'गारंबीच्या बापूने' मला वेड लावले. रत्नागिरीला माझं आजोळ त्यामुळे कादंबरीतला परिसर

मला खूप परिचयाचा वाटला मनात ठसला.

''आई लहानपणीच गेलेली, घरात वडील मी व भाऊ तिघेच. एस्. एस्. सी. झाल्यावर नोकरी करून शिकू लागलो. आता पगारातले पैसे शिल्लक टाकून मी पुस्तकं आवर्जून विकत घेऊन वाचू लागलो. घरातच छोटीशी लायब्ररी तयार झाली. ६९-७० ला मी फ्रान्सला गेलो तेवढाच काय तो वाचनात खंड पडलेला. त्यानंतर मद्रासला बदली झाली व तिथे मराठी बोलणारा औषधाला सापडणं मुश्किल होतं तिथे मराठी वाचायला काय मिळणार? पण आम्ही बदली होऊन गेलेल्या मित्रांनी तिथे मुंबईहून दरमहा मासिकं मागवायला सुरुवात केली, आणि थोडंफार वाचन चालू ठेवलं.

''७२ साली पुन्हा मुंबईला परत आलो ते ठाण्याच्या प्रदीप सोसायटीत. आता मी संसारी होतो. सगळी पुस्तकं वाचावीशी वाटली तरी ती विकत घेऊन वाचणे शक्य नव्हते आणि मोठ्या लायब्ऱ्यांमधून आपल्याला हवे ते पुस्तक नेमके मिळणे कठीण. त्यामुळे मनात विचार आला आपण सोसयटीची लायब्ररी काढली तर ! बेचाळीस ब्लॉक्सना एका पुस्तकाच्या किंमतीत बेचाळीस पुस्तकं वाचायला मिळतील. पण सर्वांनाच वाचनाची आवड असेल का? लोक मेंबर होतील का? हे प्रश्न उभे राहिले. त्यादृष्टीने मी चाचपणी सुरू केली. त्यावरून लोकांत मासिक व दिवाळी अंक लोकप्रिय असल्याचं कळलं. मी लोकांपुढे वाचनालयाचा प्रस्ताव ठेवला. सुरुवातीला तीस सभासद मिळाले. मग मी घरातच मासिकांची लायब्ररी चालू केली. दोन वर्षानी मासिक खरेदीला मिळालेल्या सवलतीतून थोडी रक्कम शिल्लक राहिली. मग पुन्हा डोक्यात विचार आला. या रकमेच्या जोडीला जर सर्वांनी थोडे थोडे पैसे दिले म्हणजे महिना १ रु. वर्गणीप्रमाणे वर्षाचे १२ रु. जर एकदम दिले तर पुस्तकं सुद्धा खरेदी करता येतील. हा विचार लोकांना पटला व आवडला. पैसे जमा झाले. मग मासिकांच्या जोडीला मी ३५२ पुस्तके विकत घेतली. आता घरात जागा पुरेना. मग सोसायटीच्या टाकीच्या चबुतऱ्यावर मी मासिकं पुस्तक घेऊन येऊन बसू लागलो. वाचनालयाचा वाढता विस्तार बघून मग सोसायटीने सोसायटीतले गोडाऊन वाचनालयाला दिले. एक कपाट दिले. ओळखीतल्या श्री. महाजन यांनी जुनी कपाटं डिमॉलिश करायची होती. म्हणून त्यांनी ती कपाटं वाचनालयाला दिली. हळू हळू वाचनालयाचं बस्तान नीट बसू लागलं. सोसायटीत शेजारी राहणारे पण कारणाशिवाय एकमेकांना न भेटणारे लोक इथे निर्धास्त भेटू लागले. एकमेकांशी बोलू लागले. यात बायका आधिक. मनात विचार यायचा, पुरुषांना वाचनाची आवड नाही की त्यांना वेळच नाही? काळे जरा खेदाने म्हणाले, सोसायटीत मग अशी प्रथाच पडली शुभप्रसंगी म्हणजे वाढदिवस, लग्नप्रसंगी किंवा कोणाच्या स्मृती प्रित्यर्थ वगैरे म्हणून लोक वाचनालयाला चांगली पुस्तकं भेट देऊ लागले. ग्रंथागार वाढू लागले व त्याबरोबर सभासद पण. आता ही वाचन गंगा सोसायटीची न रहाता मोहल्याची झाली.''

१९८४ साली वाचनालयाला दहा वर्षे झाली त्यावेळी त्यांनी एक छोटासा समारंभ साजरा केला. ग्रंथालीचे कार्यकर्ते व परखड पत्रकार पूर्वीचे म.टा. चे व आजचे लोकसत्ताचे संपादक श्री. कुमार केतकर यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले होते. त्यांनी या उपक्रमाची खूप वाखाणणी केली. नंतर वीस वर्षे झाल्यावर दुसरा समारंभ केला तेव्हा प्रा. सौ. माधवी चाफेकर आल्या होत्या. इंद्रधनुच्या कार्यक्रमासाठी म्हणून आलेल्या ज्येष्ठ कवयित्री व साहित्य संमेलनाध्यक्ष शांता शेळके यांनीही वाचनालयाला भेट दिली. वाचनालय हे शांताबाईंचं आवडते ठिकाणं. त्यांनी त्यांच्या जवळची काही पुस्तकं या छोट्या वाचनालयाला भेट दिली. सुप्रसिद्ध सीनेगीतकार श्री. प्रवीण दवणे यांनी पण या वाचनालयात आपली हजेरी लावली. ते त्यांचे सुद्धा ग्रंथ आहेत म्हणूनच.

ग्रंथालय व पुस्तकं याविषयी त्यांनी पूर्वी लिहिलेल्या आपल्या लेखात त्यांनी म्हटलं होतं, ''वाचनाची गोडी व व्यासंग नसलेले मख्ख ग्रंथपाल अनेक वाचनायलात दिसून येतात. केवळ पुस्तकांची देवाण घेवाण व पुस्तकांचा हिशेब तर कुणीही करू शकेल हो, पण पुस्तकांकडे आकर्षित करण्याचे काम त्यातले चातुर्य हीच खरी ग्रंथपालाची प्रतिभा. निव्वळ पेपरवेटच्या चेहऱ्याचा पुस्तकांची दक्षता घेणारा, पुस्तकं देवाण घेवाण करणारा संवेदना शून्य ग्रंथपाल नवीन वाचक काय निर्माण करणार?

''अमुक पुस्तक आहे का?' कोणी विचारलं तर 'ते बाहेर गेलंय, पण तुम्ही हे पुस्तक वाचा ही  ही पुस्तकं चांगली आहेत. हे तर जरुर वाचून पहा. हे ही त्यासारखेच पुस्तक आहे. हे मला बरे वाटले त्यापेक्षा, तुम्ही पण अजमावून पहा.' असं प्रसन्न चेहऱ्यानं न सांगता नुसते होय नाही असे शेवाळं न उपसलेल्या डबक्याच्या चेहऱ्यानं सांगून समोरच्या चैतन्याला गिळून टाकून त्यालाही स्थंडिल्य आणणारी ही ग्रंथपालांची भयानक उदासीनता मनाला व्यथित करते.' असे उद्गार काढून श्री. दवणे यांनी ग्रंथपाल या जमातीवर चांगलेच कोरडे ओढले होते. लोकांशी इतकं बोलायला तो ग्रंथपाल ग्रंथवेडा असायला हवा ना!''

पण श्री.काळे हे प्रवीण दवण्यांच्या कल्पनेतले आदर्श ग्रंथपाल आहेत. कारण ते स्वत:आधी ग्रंथवेडे आहेत आणि 'जे वेड मजल लागले, तुजलाही ते लागेल का?' असा वाचकाला सवाल करून त्याला ते वेड लावण्याचा ७४ पासून त्यांनी चंगच बांधलेला आहे.' पुस्तकातील ज्ञान स्वत:च्या मेंदूत भरून ते दुसऱ्यांनाही वाटण्यात आनंद काय, परमानंद मानणारा असा हा चतुरस्त्र ग्रंथपाल आहे. ते प्रत्येक साहित्य संमेलनाला आवर्जून जातात. तिथे आपल्याला आवडलेल्या पुस्तकाच्या साहित्यिकाला ते भेटतात. त्यांच्याशी चर्चा करतात. 'इंद्रधनु'च्या कार्यक्रमासाठी शांता शेळक्यांना पुण्याहून ठाण्याला कारने आणतांना वाटभर त्यांच्याशी साहित्यचर्चा करण्याचा कपिलाषष्ठीचा योग त्यांच्या साहित्यप्रेमामुळेच आला असावा. आता काळे निवृत्त झाले आहेत. पण निवृत्तीनंतर वेळ कसा घालवायचा? हा प्रश्न त्यांच्या पुढे नसून वेळ कसा पुरवायचा? असा प्रश्न त्यांना पडला आहे. कारण वाचनालयाच्या कक्षा त्यांना रूंद करायच्या आहेत. पुस्तकांवर चर्चा घडवून आणायच्या आहेत. चांगल्या वक्त्यांची त्यांच्या आवडत्या पुस्तकांवर व्याख्यानं ठेवायची आहेत. सोसायटीचे सेक्रेटरी म्हणून त्यांनी बरीच वर्षे काम केलेय. सांस्कृतिक कार्यक्रमात तर त्यांचा नित्याचा सहभाग असतोच. 'इंद्रधनु' या ठाण्याचं 'सांस्कृतीकपण' जपणाऱ्या संस्थेचे ते धडाडीचे कार्यकर्ते आहेत. सात वर्षे अध्यक्षपदही त्यांनी भूषविलेले आहे. खगोल शास्त्राचा अभ्यास करण्याचा त्यांचा मानस आहे तसेच इंग्लिश क्लासिक लिटरेचर त्यांना अभ्यासायचं आहे.

'प्रदीप प्रगती वाचनालय' म्हणजे सांस्कृतिक, वाङमयीन संदर्भातले, कार्य कशा प्रकारे करायचे याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.आता सोसायटीतले काहीजण त्यांना ह्या कार्यात मदत करायला लागले आहेत. 'अनेक सोसायट्यात सांस्कृतिक कार्यक्रम, सहभोजन, सहली, स्पर्धा होतात. गुरखा, वीज, पाणी, झाडुवाला, बिल्डींगफंड, कारपार्किंग वगैरे बद्दल चर्चा घडतात. त्या गोष्टी आवश्यक समजल्या जातात. पण सर्वांच्या सहकार्याने फंड उभारून सोसायटीचे एक वाचनालय असावे असे आम्हाला वाटत नाही हा आपला बधिर सुखवस्तुपणा लज्जास्पद आहे हे कधी जाणवणार?' हे ही गीतकार प्रा. प्रवीण दवणे यांनी पोटतिडिकेनं आपल्या लेखातून काढलेले उद्गार आहेत.

वास्तविक पाहाता सोसायटीतल्या निवृत्त लोकांनी किंवा गृहिणींनी (सुशिक्षित पण नोकरी न करणाऱ्या) यासाठी पुढाकार घ्यायला काय हरकत आहे? नाक्यावर नाक्यावर उभ्या राहणाऱ्या तरुणांच्या झुंडीप्रमाणे कट्ट्यांवर, देवळांत जथ्याने नियमित येऊन बसणाऱ्या (वेळ

घालवण्यासाठी म्हणून) निवृत्त स्त्री पुरुष, तरुण, वृद्धांनी, ज्येष्ठ नागरिकांनी असे कार्य केल्यास समाजसेवाही होईल त्यांचा वेळही चांगला जाईल, भेटीगाठी होतील, वाचन घडेल, चार चांगल्या गोष्टी कानावर पडतील, आपली मतं इतरांना सांगता येतील. बघा विचार करून !

अशा भोवतालच्या परिस्थितीत 'ज्ञानाची पाणपोई' काढणारी प्रदीप सोसायटी व ती नेटानं, नेमानं, विनम्रपणे, नि:स्वार्थी बुद्धीने चालवणारे श्री. नारायण काळे हे दोघेही कौतुकास पात्र आहेत. पूर्वी दहा वर्षांनी समारंभ करणारे वाचनालय आता दर वर्षी वार्षिक सोहळा साजरा करते. वाचनालयाचा वाढदिवस म्हणा ना. उत्तम उत्तम वक्ते त्या दिवशी बोलावले जातात. विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी ग्रंथपाल, 'दिशाचे' कार्यकारी संपादक प्रा. मोहन पाठक, निवेदिका स्वाती खंडकर व अगदी २००७ ला मानस शास्त्रज्ञ व लेखक डॉ. आनंद नाडकर्णी यांना वक्ते म्हणून पाचारण करण्यात आले होते.

आता या वाचनालयात श्री. काळे यांना आणखी मदतीचे हात पुढे आले आहेत. पुस्तकाची व्यवस्था व व्यवस्थापन व देवाण घेवाण इत्यादी कामासाठी. त्यामुळे वाचनालय चांगलेच फोफावलेय, स्थिरावलेय. त्याची अशीच भरभराट व उत्कर्ष होवो. श्री. काळे यांच्यासारख्या ग्रंथवेड्या ग्रंथपालालाही उत्तम दीर्घायुरोग्य लाभो. हीच सदिच्छा व ह्याच हार्दिक शुभेच्छा!

**श्रीमती आशा भिडे**
बी-९, विजय अपार्टमेंटस्
आराधना टॉकीज जवळ, ठाणे (प.)

●●●

## *सर्वात मोठे*

| | | |
|---|---|---|
| १ | सर्वात मोठा पक्षी | शहामृग |
| २ | सर्वात मोठा रेल्वे पूल | लाँग ब्रिज (अमेरिका) |
| ३ | सर्वात मोठा कालवा | सुएझ |
| ४ | सर्वात मोठा मासा | निळा देवमासा |
| ५ | सर्वात मोठे ग्रंथालय | लायब्ररी ऑफ काँग्रेस(वॉशिंग्टन) |
| ६ | सर्वात मोठे संग्रहालय | नॅचरल हिस्टी म्युझियम न्यूयॉर्क |
| ७ | सर्वात मोठी नदी | नाईल |
| ८ | सर्वात मोठे वाळवंट | सहारा उ. आफ्रिका |
| ९ | गोड्या पाण्याचे सरोवर | सुपीरिअर सरोवर - कॅनडा |
| १० | सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर | कास्पियन समुद्र (रशिया - इरान) |
| ११ | सर्वात मोठे खंड | आशिया |
| १२ | सर्वात मोठ्या क्षेत्रफळाचा देश | सोव्हिएट रशिया |
| १३ | सर्वात जास्त लोकसंख्येचा देश | चीन |
| १४ | सर्वात मोठा महासागर | पॅसिफिक |
| १५ | सर्वात मोठे द्वीपकल्प | भारत |
| १६ | सर्वात मोठे बेट | ग्रीनलँड |
| १७ | सर्वात मोठा रेल्वे प्लॅट फॉर्म | स्टारवीक (स्वीडन) |
| १८ | सर्वात मोठे रेल्वे स्टेशन | न्यूयॉर्क |
| १९ | सर्वांत लांब लोहमार्गावर जाणारी गाडी | ट्रान्स सैबेरियन - रशिया |

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*शुनःशेप आख्यानाचा संदर्भ घेऊन केलेले विवेचन हा लेखमालेतील पुढील लेख आहे - संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या मागील अंकात (जून २००८) मी आदरणीय श्री. लालकृष्ण अडवाणी यांच्या यज्ञ समारंभाचे चित्र छापले होते. ह्या यज्ञाच्या सत्य स्वरूपाचा विचार करण्याचे योजिले होते.

'यज्ञ' ही एक वैदिक संस्कृती व ज्ञान परंपरेतील 'धर्म क्रिया' आहे. तिचे 'दर्शनी (वा 'दृश्य') कर्मकांडी स्वरूप सर्वसाधारणपणे पाहिले वा 'मानले' जाते व तसेंच 'जाणले' जाते. हा एक 'काम्य यज्ञ' ह्या जातीचा यज्ञ असतो, असेही समजले जाते. याचाच अर्थ 'आत्मयज्ञ' व 'काम्ययज्ञ' यामध्ये कांही मूलभूत फरक असावयाला हवेत व ते जाणले गेले पाहिजेत.

**अस्पष्ट यज्ञ संकल्पना :**

कां व कशाला हा खटाटोप अध्यात्मवादी किंवा स्पिरीच्यूअॅलिस्टांनी करावा ?

थोडक्यात, या विचारांचा रोख व समज असा आहे कीं, ह्या गोष्टी दुर्लक्ष करण्याच्या लायकीच्या आहेत; किंवा, भौतिकवादी, विज्ञानवादी, राजकारणी मंडळी, व 'धर्मवादी' व 'अध्यात्मवादी' यांनी आपआपल्या, वेगवेगळ्या विश्वासाच्या 'बाऊंडरीज् (मर्यादेत)मध्ये काय गोंधळ घालावयाचा तो घालावा, अशा स्वरूपाच्या आहेत !!

म्हणूनच, मी आणखी दोन चित्रे दाखवून आपले लक्ष वेधू ईच्छितो. 'यज्ञ' किंवा 'देवळातील प्रार्थना' सर्रास कोणत्या विश्वासावर किंवा अपेक्षांवर घडत आहेत, ह्या घडीला 'निधर्मी, समधर्मभाव' सेक्यूलर घटनेच्या देशात?



**सोनिया गांधी - महाकाल मंदिर उज्जैन**

कॉंग्रेस पक्षाच्या सर्वश्रेष्ठ नेत्या श्रीमती सोनिया गांधी. ह्या उज्जैनच्या एका प्रसिद्ध महाकाल देवळात गेल्या आहेत. हा फोटो टाईम्स ऑफ इंडियाच्या २१ जून २००८ पान १२ वरचा आहे. त्याखाली मथळा आहे.

"With her Government in peril the Nuclear deal uPA chief Sonia Gandhi seeks divine blessings during her visit to the Mahakal Temple in Ujjain on Friday." 'सरकार वाचवण्यासाठी ही धार्मिक प्रार्थना होय ना?

इथे, एक गोष्ट मी स्पष्ट मांडू इच्छितो कीं ह्याचा 'राजकीय दृष्टिकोनांतून' आपल्याला विचार करावयाचा नाही, तर ह्या 'कामना' (एखाद्या हिंदू) देवळात जाऊन फलद्रुप होण्याची श्रद्धा व 'क्रिया', कोणत्या जातीची व 'सत्यतेची आणि वैश्विक वैज्ञानिक श्रद्धांवर आधारित असू शकेल, ह्या गोष्टीचा विचार व्हावा !!



**पर्जन्य यज्ञ**

तसेंच दूसरे चित्र आहे २६ जून २००८ मधील टाईम्स ऑफ इंडिया मधील. वर्तमान सांगणारे. अहमदाबाद येथे बुधवारी २५ जून २००८ ला केलेल्या यज्ञाचे. ह्याचा हेतू होता, 'पाऊस पडावा', आणि म्हणूनच पर्जन्य देवतेचे आवाहन अभिप्रेत असलेला !!

**<u>यज्ञ एक भौतिक यंत्र</u> :**

काय निष्कर्ष निघतात ह्या ताज्या आधुनिक घटनांमधून?

१) 'यज्ञावर' व त्याच्या फलिते देण्याच्या सामर्थ्यावर 'कळत - नकळत' विश्वास आहे. पुढाऱ्यांचा, मतदारांचा आणि सामान्य जनतेचा नाही का?

२) ह्या कामना राजकीय पुढारी सुद्धा आपल्या हेतू किंवा प्रार्थनेसाठी, 'यज्ञ' ह्या वेदिक संकल्पनेवर श्रद्धा व विश्वास ठेवून करतात.

३) तसेंच पाऊस पडण्याची जी क्रिया नैसर्गिक मानली जाते, तिच्या 'ऋतूनिष्ठ कार्यक्रमात' खंड पडला, तर 'यज्ञ' करून ती नियमित सुरू करण्यावर असलेला विश्वास दिसतो.

**वेदिक यज्ञ संकल्पना व शास्त्र :**

आतां या 'विश्वासांना' व 'श्रद्धांना' तपासून पाहूंया.

'यज्ञ' ही संकल्पना वैदिक आहे. जो कार्यक्रम 'यज्ञ' म्हणून राबविला जातो तो 'शास्त्र' ह्या प्रकारात मोडतो. 'यज्ञशास्त्र' नावाचे 'कर्मकांड' म्हणू या फार तर!! मग, वैदिक बीज संकल्पना व त्यावर आधारलेले शास्त्र यांचा संबंध कोणता?




ह्यावर, स्वामी सत्य प्रकाश सरस्वती (हे डॉक्टरेट ऑफ सायन्स व अलाहाबाद युनिव्हर्सिटहीज. केमीस्ट्री डिपार्टमेंटचे 'हेड ऑफ दि डिपार्टमेंट' होते व 'आर्यसमाजी' होते), ते काय म्हणतात ते पाहू या.

''वेद को समझने के लिए श्रुति और शास्त्र के अन्तरको समझना आवश्यक है । मैने अपनी सुविधा के लिए **<u>वैदिक वाङमय को तीन वर्गो मे विभाजित कर रखा है, श्रुति, शास्त्र और साहित्य ।</u>**

**वैदिक संहिताओ को मै <u>श्रुति</u> कहना चाहुंगा,**

अर्थात वह वाङ्मय जो आदि-मानव प्रभू की प्रेरणा से प्राप्त हुआ इस श्रृति के आधार पर सृष्टि के नियमों और विविध विस्तारोंसे परिचित होकर ज्ञान आदान - प्रदान की सुविधा के निमीत्त ऋषियोंने जो कुछ हमे विभिन्न समयों मे दिया वह 'शास्त्र' है।

वेदांग, उपांग और उपवेद, एवं विविध धर्मशास्त्र, श्रौतसूत्र और स्मृतियाँ इस प्रकार के वाङ्मय है।''

''ये आदेश (श्रृति) विकास की परंपरा द्वारा हमें नही प्राप्त हुए और न उनमे परिवर्तन होने की सम्भावना है।

१) यद् भद्रं तन्न आ सुव:;
(जे चांगले त्याचा स्वीकार करूं)

२) स्वस्ति पन्था - मनुचरेम;
(चांगला मार्ग चोखाळू)

३) शं योरभि अवन्तु न:;
(कल्याणकारक गोष्टी आमच्याकडे येवोत)

४) इशावास्यमिदं सर्वम्
(सर्व कांही ईश्वरव्याप्त आहे)

५) कुर्वनेवेह कर्माणि जिजीविषेत्
(याप्रमाणे कर्म करीत जीवन व्यतीत करण्याची इच्छा करावी)

आदि वाक्य 'श्रृति' है। इनमे परिवर्तन हो जाए तो अनर्थ होगा।''

**वैदिक शास्त्र म्हणजे काय ? :**

आतां 'शास्त्र' म्हणजे काय? 'शास्त्र' ह्या शब्दाने तुम्ही ज्या संकल्पना उराशी बांधल्या असतील त्या विसरून वेदिक ज्ञानात 'शास्त्र' ह्या शब्दाचा कुठचा सत्य अर्थ निघतो तो डॉ. सत्यप्रकाश सरस्वती ह्यांच्या विवेचनाच्या संदर्भात ध्यानात घ्या !!

''शास्त्र श्रृति का वह भाग है। जो बीजवत् है। इस बीज पर मनुष्य को तपस्या करनी पडेगी। शास्त्र को विकसित करना पडेगा।

शास्त्र को विकसित करने की पात्रता केवल मनुष्य मे हैं, किसी अन्य प्राणि मे नही।

ऋचाओं को समझकर और सृष्टि का अवलोकन करके मनुष्य को शास्त्रका विकास करना पडेगा।''

पुढे डॉ. सत्यप्रकाश सरस्वती जे सांगतात ते भौतिकवादी वैज्ञानिकांनी लक्षांत ठेवण्याइतके महत्वाचे आहे.

''परंपरा की दृष्टि से कोई भी ऋषि (शास्त्रज्ञ) शास्त्र के क्षेत्र मे पूर्ण पुरूष न कभी था, न है, न कभी आगे होगा। बडे से बडे शास्त्रकार भी अपने शास्त्रके क्षेत्रमे अग्रभागी तो बनेंगे पर शास्त्रके अंतिम घोर तक कभी न जा पायेंगे।

आतां 'वेदान्त वादी अध्यात्मवाद्यांनी जे सत्यप्रकाश सरस्वती यांच्या पुढील विधानांच्यावर खोल विचार करणे अत्यावश्यक आहे. कां ते नंतर विवेचन करू या.

''शास्त्रीय ज्ञान की सरिता के प्रवाह की तरह आगे बढते जाने में ही मानवजाति का कल्याण है । शास्त्रीय ज्ञान न किसी एक ऋषि की देन है, और न किसी एक व्यक्ति की संपत्ति।

अगली पिढी के ऋषि को पिछली पिढी के ऋषिसे, अपने इस 'सीमित क्षेत्र' में जिसमें उसने तपस्या की है, अधिक ज्ञानवान होना चाहिए और

<u>**ज्ञानकी यह परंपरा बराबर आगे बढती रहना चाहिए।''**</u>

मानवी संस्कृतिच्या इतिहासांत ऋग्वेद व वेद संहितांना पहिले स्थान आहे. त्यामुळे ह्या संहिता ऐतिहासिक दृष्ट्या सुद्धा मानवी समाजाच्या संस्कृतीच्या आरंभीच्या काळातील मानाव्या लागतील.

त्यांतील नमून्यादाखल ज्या 'ऋचा' (५ नमूने) डॉ. सत्यप्रकाा सांगतात, त्या कदाचित एखाद्या आधुनिक सोशल क्लबच्या (कॉंस्टीट्यूशन) घटना व नियमावलीत सुद्ध सांपडतील. आणि तशा ह्या वेदिक काळानंतर जन्माला आलेल्या इतर कांही धर्म व तत्वज्ञाने व संस्कृत्या मध्ये सुद्धा सांपडतील. पण, ह्या वेद संहितेंचे अलग व दैदिप्यमान, तेजस्वी महत्व आहे. कारण वैदिक शास्त्रे वैदिक बीज संकल्पनेशी एकात्म बांधलेली आहेत !!


**श्रुती हे संस्कृतीचे बीज :**

काय आहे हे वैशिष्ट्य? हे विचार 'आदि-मानव प्रभू प्रेरणा' मुळे प्राप्त झाले. ही वचने 'अपौरूषेय' विचारांची द्योनक आहेत. याचा अर्थ ह्यामधील 'नौतिकता' ही ऋषि संशोधित संकल्पना आहे. ह्यात सांपडलेला संस्कृती प्रवाहाचा मार्ग हा प्राणी जीवनांतून मानवी जीवनांत संक्रमण व प्रवेश करणाऱ्या जीवात्म्यांना संस्कृतीच्या प्रवाहाची एक उच्च दिशा सांगत आहे. ह्या विश्वाच्याकडे त्यातील प्रत्येक चेतन व अचेतन वस्तूंत सुद्धा एकच 'ईश्वरीतत्व' आहे असे सांगत आहे. हे भौतिक जीवन कुठल्या तऱ्हेच्या 'कर्मक्रिया' करीत व्यतीत करावयाचे, याबद्दल जागृत करत आहे; मार्गदर्शन करीत आहे.

अशा तऱ्हेच्या 'आदि-बीज संकल्पना' ऋग्वेद, यजूर्वेद व इतर वेद संहितेमध्ये विखूरलेल्या सांपडतील. कदाचित, सध्दाच्या एकांगी 'बौद्धिक ऐश्वर्याच्या' प्रकाशांत त्या सामान्य वाटतील. सध्याच्या भौतिक व्यावहारिक गुंतागुतीच्या व्यवहारांत व विषयांत उदभवणाऱ्या प्रश्नांच्या तुलनेने 'प्राथमिक पातळीच्या' वाटतील. पण ह्या Intellectual Complexity च्या आकर्षणात मूळ बीज धारणेला प्रधान महत्व आहे व असावयाला हवे. त्याचे कारण <u>**'बीज व त्यावर वाढलेला वृक्ष ह्या चैतन्य व प्राणशक्तीच्या प्रवाहाचे, विस्ताराचे, संभाराचे, ऐश्वर्याचे वैश्विक सत्यतत्व आहे. जसे, हापूसच्या आंब्यांच्या फळाचे कौतूक वाटणाऱ्या रसिकाला ह्या गोडीचे, माधुर्याचे रहस्य त्या आंब्याच्या बाठीत म्हणजे बीजांत असते ह्याचे भान नाही.**</u>

**कां बीज संवर्धन आवश्यक? :**

त्याचे अनादि स्वरूपही जाणवत नाही. त्या बीजाचे कौतूक नाही, जाणीव नाही. सोबत एक चित्र छापले आहे. टाईम्स ऑफ इंडियाच्या ता. २३-०६-२००८ च्या अंकात पान १७ वर सांपडेल.




**बीज - जतन योजना**

जे खरे व कायम टिकणारे नाही ते खरे व कायम टिकणारे आहे असे मानणारा असतो, तो 'मी'.

''Safe storage for crucial plant genes''असे त्याचे इंग्रजी शीर्षक आहे.

आर्क्टिक बेट म्हणजे नॉर्वे देशांच्याही उत्तरेला उत्तर ध्रुवाजवळ जवळ ४-५ मिलीयन धान्यबीजांची सँम्पल-नमूने ही एका विशिष्ट पद्धतीने जपून ठेवण्यात आली आहेत. युद्धे, साथीरोग, किंवा नैसर्गिक उत्पात यापासून संभाळण्यासाठी, वाचवण्यासाठी एव्हढेंच नव्हे, तर अशा प्रलयकारी संकटानंतरही निरनिराळ्या वातावरणांत त्यांची वाढ व्हावी म्हणून. एकाच धान्याच्या वेगवेगळ्या जातीही त्यांत सामील आहेत. हा उद्योग ''The Svalbard Global Seed Vault'' कॅरी फाऊलर ग्लोबल क्रॉप डायव्हर्सिटी ट्रस्टने केला.

ह्याची तुलना 'Noha's Arc' ह्या पाश्चात्य संस्कृतीतील इतिहास किंवा आपल्या पुराणातील 'मनु'ची (हिमालयाला बांधून ठेवलेल्या नौकेशी) करतां येईल. कदाचित सध्याच्या मानवी समाजाला आपल्या संस्कृतीचा संभाव्य विनाश व निसर्गाचा जगड्व्याळ वैश्विक प्रलय दिसत असावा. त्याची चाहूल सध्याच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक भौतिकवादी धारणेत विपूलतेने दिसूं लागली आहेच, ह्याबद्दल शंका नाही.

प्रश्न राजकीय राहिला नाही. मानवी समाज, मानवी संस्कृती एव्हढेंच नाही तर ह्या पृथ्वीवरची जीवधारणा सगळीच धोक्यात आली आहे.

त्यामुळेच सोनिया गांधी देखील महाकाल मंदिरात प्रविष्ट झाल्या असाव्या !!

**'Nuclear Key' प्रलयाची हमी देणारी किल्ली:**

प्रश्न आहे कीं भौतिक विज्ञानाने मानवाच्या हातात 'भस्मासुरी' अस्त्र ॲटम बॉम्ब, हैड्रोजन बॉम्ब व न्युक्लियर एनर्जीच्या स्वरूपात दान केले आहे.

पण कुणाच्या हातांत ही **'न्युक्लीयर की'** (**Nuclear Key**)असेल ती सगळ्यात **'सामर्थ्यवान सत्ता'** असणार. त्या सत्तेची 'जात' सात्विक असेल याची खात्री नाही, कारण ती 'विध्वंसक' जातीची आहे. ज्याच्या हातात आहे, तो 'पुरूषोत्तम' नाही. त्याच्या शहाणपणाची खात्री नाही.

त्याच्या ठिकाणी कोणते दुर्गूण, अहंकार, मत्सर, मद, क्रोध, लोभ असतील याची माहीती नाही. त्यावर त्याचा संयम असेल याची ग्वाही कोणी देऊं शकत नाही. त्याच्यावरती त्यालाही दंड देणारा अधिकारी नाही. हतबल अवस्था उघड दिसते आहे !!

म्हणजेच, ह्याचा अर्थ ती किल्ली कुणाच्याही हातांत जाऊं शकते. सध्या ती अमेरिकन प्रेसिडेंटच्या हातात आहे. ती उद्या 'तालीबानच्या' हातात जाऊ शकते. कुठल्याही क्षणी पृथ्वी दुभंग पावून अवकाशांतून एखाद्या ताऱ्यासारखी भस्मसात होऊ शकते.

'बिग बँग' चे प्रात्यक्षिक क्षणाक्षणाला जवळ येते आहे. पण, ते सृष्टि निर्मीतीचे नव्हे तर वैज्ञानिक सृष्टिसंहारक पद्धतीचे !!

म्हणून मग, 'प्रार्थना', 'यज्ञ' व 'ईश्वरी शक्तीची' आठवण होणे अपरिहार्य व स्वाभाविक आहे. मग हा उघडच गोंधळ आहे, आपल्या श्रद्धांचा, विश्वासांचा व चिरंतन वैश्विक शक्तीबद्दलचा !!

**पण, भारतीय संविधानातून अमेरिकेच्याच धर्तीवर State and Religion हे स्वतंत्र ठेवले आहेत. त्यामुळे सामाजिक मनावर अप्रत्यक्षपणे या जगावर 'इश्वरीसत्ता' चालत नसून फक्त निसर्ग (Mechanical Auto machine) नावाचे एक यंत्र नियंत्रण ठेवत आह. सामाजिक, राजकीय, धार्मिक वगैरे जे प्रत्येक देशांतले प्रश्न आहे, ते एका मानवी संकल्पनेतून,**

**पण निरीश्वरवादी भूमिका व श्रद्धांतून चालवणाऱ्या राजसत्ता, लोकसत्ता व हुकूमशाही या 'राज्यशास्त्रीय तंत्रातून किंवा मार्फत चालणार हाच योग्य पर्याय आहे, असे जनमानसावर ठसविले आहे. हे वैचारिक बांधिलकीचे निरीश्वरवादी सूत्र शिक्षणक्षेत्रातून व राज्यकारभाराच्या अनेक भौतिक रचनायंत्रांतून बिंबवले जाते.**

**म्हणूनच डॉ. सत्यप्रकाश सरस्वती ज्या 'बीज' तत्वाकडे लक्ष वेधतात. ती ईशावास्य-उपनिषदातील श्रुती 'इशावास्यनिदंसर्वम्' याचा खरा अर्थबोध सध्याच्या मानवजातीला होणे आवश्यक आहे.**

**''ईश्वर हा या विश्वाचे सार आहे''** हे आपल्या **'उपनिषदरहस्य ह्या पुस्तकांत गुरूदेव रा. द. रानडे लिहीतात.**

'' निखिल चराचर **सृष्टीचे उगमस्थान,** व त्यांतील **सर्व शक्तीचे व प्रकाशाचे मूळ कारण** असलेले **परब्रह्मच** या जगांत दृग्गोचर होणाऱ्या **सर्व जड वस्तूंचा आधार** आहे असे **उपनिषदकारांचे मत आहे.''**

''या संबंधी **छांदोग्य उपनिषदात** गुरूशिष्यांचा एक संवाद दिला आहे. त्यांत सृष्टीस आधारभूत असलेले सार किती सूक्ष्म आहे हे दाखविण्याकरितां गुरूने आपल्या शिष्यास न्यग्रोध (वड झाड) वृक्षाचे एक लहानसे फळ आणण्यास सांगितले, व ते फोडल्यावर त्या फळाच्या आंतील भागांत काय दिसतें तें त्यास पाहण्यास सांगितले. अत्यंत सूक्ष्म आकाराच्या अनंत बिया त्यास दिसल्या. त्यापैकी एक बीं फोडून त्यात काय दिसते ते पाहण्यास गुरूने त्यास आज्ञा केली. त्याप्रमाणे त्याने एक **बी फोडून पाहिले, पण 'आपणांस त्यांत काही दिसत नाही' असे त्याने सांगितले.** तेव्हा गुरू म्हणाला,

**''सौम्य, तुला दिसत नाही तीं सूक्ष्म वस्तूच या न्यग्रोध वृक्षाचें सारसर्वस्व आहे असे समज, व मी सांगतों या गोष्टीवर विश्वास ठेव.''**

**छांदोग्य उपनिषदातील संदर्भ असा :**

''न्यग्रोध फलभत आहरेतिदं। भगव इति भिन्ध्दीति।

भिन्नं भगव इति द्विमत्र पश्यसीति। अण्य इवैमाधाना

भगव इति। आसामङ्ग एकां भिन्ध्दीति। भिन्ना भगव इति।

किमत्र पश्यसीति। न किंचन भगव इति। तं होवाच यं वै

सोम्य एतमणिमानं न निभालयस एतस्य वै सोम्य एषोऽनिम्न

एवं महान्यग्रोधनिष्ठति। श्रद्धत्स्व सोम्येति। सथं

एषोऽणि मैतदात्म्यमिदं सर्व तत्सत्यं स आत्मा तत्वमसि

श्वेतकेतो इति।''

छांदोग्य. ६.१२

**यज्ञ कोणती बीज संकल्पना?:**

हे कदाचित विषयांतर वाटेल. पण, तशी स्थिती नाही. 'यज्ञ' ही चीज आपल्याल परिचित होते, ती सुरवातीला उल्लेख केला त्या पद्धतीने 'काम्य यज्ञाच्या' कार्यक्रमाने. त्यामुळे सामान्य माणसाच्या कांही कठीण समस्या सुटण्यासाठी ही एक धार्मिक युक्ती आहे. असा समज सध्या प्रचलित आहे.

पण, तसे नव्हे ! **ह्या 'यज्ञ' संकल्पनेचे बीजस्वरूप ऋग्वेद व इतर वैदिक संहितेत आहे.**

**''अयं, यज्ञो भुवनस्य नाभिः।''**

**ऋग्वेद १.१६४.३५**

**ह्याचा सरळ अर्थ कीं 'यज्ञ' हे सगळ्या भूवनांचे नाभिकेन्द्र आहे. सगळ्या विश्वव्यवहाराची**

**सूक्ष्म बीजरूपी संकल्पना ही, 'यज्ञ' अशी आहे. त्यामळे काही मूलभूत Transformations रूपांतरे होतात.**

दिशाच्या डिसेंबर २००७ च्या अंकात मी यावर सविस्तर चर्चा केली आहे. ती जरूर नजरेखालून घालावी. पण, सृष्टी उत्पत्ती व तिचा व्यवहार सगळा जीवन व्यापार हा कुठल्या तत्वावर चालतो? हे समजणे मानवाला आवश्यक आहे. हे 'यज्ञ' ह्या संकल्पनेत सामावले आहे. हे गूढ उकलण्याचे प्रयत्न कसे करावयाला हवेत? मग, भौतिक विज्ञान हे प्रयत्न आपल्या परीने करीत आहे. तरी अपयश येते आहे त्याचे कारण काय? ह्याचे उत्तर 'वैदिक ज्ञानात' बीज रूपाने उपलब्ध झाले.

'ऋग्वेदा'ला मनुष्य समाजाच्या इतिहासात एक प्रथम ज्ञान संहितेचे स्थान आहे हे जगद्मान्य आहे. त्याच्या **नासदीय सुक्तात** (१०.१२९) **'सृष्टी उत्पत्ति सूक्ता** मध्ये **सृष्टिपूर्व प्रलयावस्था** (१-२), **जीवनिर्मीती** (३-४), आणि **सुष्टिनिर्मीतीची अगम्यता** (६-७) या उपभागांत सांगितली आहे.

**कोण या सूक्ताचा रचनाकार? :**

या **सूक्ताचा ऋषी** हा **परमोष्ठिन प्रजापति** व देवता **परमात्मन** व त्याचा **छंद - निष्टुभ**

ह्या सुक्ताचा अर्थ **सिद्धेश्वरशास्त्री डॉ. चित्राव** सांगतात तो असा ''ऋग्वेदातील हे सर्वश्रेष्ठ सूक्त होय. शतपथ ब्राह्मणात या सुक्ताचे संपूर्ण विवरण दिले असून, उत्तरकालीन वैदिक साहित्यातील (तैतरीय ब्राह्मण २.८.९.३) तसेंच उपनिषदे, भगवद्गीता, मनुस्मृती आदीमधील सृष्टी उत्पत्ती विषयक विवेचन याच सूक्ताच्या आधारे केलेले दिसते.

सृष्टि निर्मितीचे कोडे देवमनुष्यांना अगम्य असल्याचा या सुक्ताचा सिद्धांत **भगवदगीतेतील 'अनादिमत्परं ब्रह्म न सत्रन्नासदुच्यते'। (१३.१२)**

(''सर्वश्रेष्ठ ब्रह्म हेच ते ज्ञेय असून, ते अनादि आहे. ते सत् किंवा असतूही म्हणता येत नाही.'')

**''तमरूपी पूर्वसृष्टीतून प्रथमत: जल, आणि नंतर ऋषी तपस्येने नामरूपात्मक जगत् निर्माण झाल्याचा या सुक्ताचा सिद्धांत ऋग्वेदांत अन्यत्र (९.१०९.४) तसेच मनुस्मृतीमध्ये पुनरावृत्त केला आहे. (मनु १.५)''**

ह्या 'नासदीय सूक्तातील 'यज्ञ सुक्तात ७ सुक्ते आहेत. त्यातील ४ थ्या सुक्तात एक महत्वाची गोष्ट सांगितली आहे.

''**ब्रह्माच्या मनोबीजातून** सर्वप्रथम **काम (सृष्टि निर्माण प्रवृत्ती) उत्पन्न झाली.** मूळ परब्रह्माचा (असत्) विनाशी आणि दृश्य सृष्टीचशी (सत्) जडलेला हा पहिला संबंध होय.''

कां यां सूक्ताचे एव्हढे महत्व? कारण येथे **'मन' ''Mind''** ह्याचे बीज **'ब्रह्म'** ह्या मुळ तत्वात सांगितले आहे.

**पाश्चात्य संस्कृतीतील संकल्पना :**

पाश्चिमात्य संकल्पनेत त्यांच्या ज्या 'थियरीज' आहेत त्यांत इच्छाशक्ति, मानसिक शक्तिच्या उगमाची चर्चा नाही. ''Brief History of Time'' लिहीणारे **Stephen Hawking** यांनी स्वत:ची 'Quantum Cosmology' ही शेवटी विश्वनिर्मीतीचे गूढ उकलेल अशी थियरी मांडली होती. पण, १९९४ मध्ये त्यांनी कबूल केले कीं ''पदार्थ विज्ञान शास्त्र हे अंतिम सत्य (Theory) काढण्यास असमर्थ आहे''

**Martin Harwit** हे एक ॲस्ट्रोफिझीसिस्ट आणि

'हिस्टोरियन ऑफ सायन्स' मानले जातात. ते म्हणाले,

''Astronomy is an essentially passive activity. We can only defect celestial phenoumena by means of information falling to us from the sky, mostly in the form of electromagnetic radiation, Ironic/cosmology will continue, of course, as long as we have poets as imaginative and ambitious as Hawkings, Linde, wheeler, and yes, Hoyle.

Their visions are both humbling, in that they show the limited scope of our empirical knowledge, and exhilirating, since they also testify to the limitlessness of human imagination.

At its best, ironic cosmology can keep us awestruck. But it is not science.''

ह्याचा मतितार्थ 'पदार्थ विज्ञानशास्त्र' हा फक्त या विश्वातील 'जड', व्यक्त वस्तूंचा अभ्यास करते. पण, जड वस्तूंचा 'अव्यक्त' जगाशी असलेल्या 'बीज' तत्वाबद्दल विचार करीत नाही.

भौतिक ज्ञानपद्धतीतील मर्यादा आतां कांही स्वतंत्र बुद्धीच्या शास्त्रज्ञांना जाणवूं लागल्या आहेत. त्याचे एक उदाहरण **Otto Rossler ऑटो रॉसलर** ह्याचे सांगता येईल. हा एक जर्मन थिऑ रेटिकल बायोकेमिस्ट आणि chaos या थियरीचा विचारवंत, त्याने १९७० च्या मध्यंतरी Rossler Attractor म्हणून एक Mathematical Monster चा शोध लावला होता.

सॅन्टा फे या अमेरिकेतील एका इस्टिट्यूटमध्ये 'The limits of scientific knowledge' या विषयावर एक Workshop झाले. तिथे रॉसलर म्हणाले,

''There are two limits to knowledge one was inaccessibility. We can never be sure about the origin of the universe, for example, because it is so distant from us both in space and time.

''The other limit distortion, was much worse. The world can deceive us into thinking we understand it, when actually we do not. If we could stand outside the universe, we would know the limits to our knowledge; but we are trapped inside the universe, and so our knowledge of our own limits must remain incomplete.''

''There exist situations where you are unable to find out about the truth from the inside. But, simply by posing thought experiments, we may find a way to transcend the limits of perception.''

''थोडक्यात जो मानव ह्या विश्वाच्या निर्मीतीतीच एक जीव आहे व त्याच्या शरीर व बुद्धीवर कांही मर्यादा टाकल्या आहेत, त्याला ह्या विश्वाच्या निर्मितीबद्दल व स्वत:च्या अस्तित्वाबद्दल जर सत्य जाणून घ्यावयाचे असेल तर ते अशक्य आहे. एक तर हे जग, त्याची निर्मिती क्षण फार लांबच्या काळातला आहे - अंतराने व काळानेही. सगळ्यात मोठी अडचण आहे कीं ह्या सीमित वा मर्यादित ज्ञानेद्रियांच्या मुळे जगाचे जे ज्ञान इंद्रियजन्य होते, ती एक जगाने केलेली फसवणूकच असूं शकते.''

थोडक्यात म्हणजे 'कठपुतलीं'च्या 'पपेट शो' मध्ये त्या बाहुल्यांनी आपल्याला नाचवणाऱ्या नाटकशाळेच्या मालकाच्या बुद्धीचा, हेतूचा अंदाज जाणण्याचा व कमावण्याच्या प्रयत्न करण्यासारखा आहे.

पण, हीच गोष्ट १०,००० वर्षापूर्वी ह्या भारतात आपल्या ऋषींनी या अडचणींवर मात केली व अतींद्रिय साधनेद्वारे परमेश्वराकडून - म्हणजे ह्या विश्वाच्या निर्मात्याकडून अनुभूतींद्वारे 'समाधीजन्य ज्ञान' असे 'वेदांचे' मिळवले व त्यांच्या संहिता पुढील युगायुगांतील मानवी समाजाला उपलब्ध करून दिल्या. एव्हढेंच नव्हे तर त्या विश्वातील अत्यंत गूढ असा कार्यक्रम कोणता आहे - या विश्वाच्या जगड्व्याळ चालणाऱ्या जीवन व्यवहाराचे सूत्र,

हेतू, उद्दिष्ट काय आहे. हे शोधून काढले.

**कसा आहे हा जीवन प्रवाह? :**

ज्या मूळ बीज संकल्पना या पृथ्वीवर व विश्वात उत्पन्न झाल्या आहेत, त्यांचे संवर्धन व संक्रमण हेच एका अनादि सांस्कृतिक प्रवाहात आहे. त्यात लहान मोठे जीव, प्राणी, वनस्पती, ग्रह, तारे, नद्या, समूद्र, खडक, धूमकेतू सामील आहेत. पण, त्या संस्कृतीच्या अग्रभागी तुलनेने श्रेष्ठ अशी निर्णय घेण्याची क्षमता व सामर्थ्य मानवाला - व मानवी समाजाला, मूळ स्वरूपांत लाभलेले आहे. तो अंतिमत: यशस्वी होईल हे भविष्य आहे !! मानवी फॉर्म (रूप) अमृत (पुत्राचे) आहे.

पण, ह्या जन्मजन्मांतरीच्या प्रवाहात - आकाश-गंगेच्या स्रोतात, प्रत्येक सहभागी प्रवाश्यांचा उत्कर्ष व वृद्धी आवश्यक आहे. खांच, खळगे, अडचणी, प्रलय, उल्कापात, वादळे, संघर्ष वगैरे अडचणी ह्या प्रवासातील एक न टळणारा भाग आहे.

एव्हढेंच नव्हे, तर ह्या आकाशगंगेच्या प्रवाहाचे नेतृत्व करणाऱ्या मानवाची देखील क्षमता व नैतिकता युगायुगातील प्रवासात मुशींत टाकलेल्या सोन्यासारखी झांकळून उन्नत होणार आहे. त्याच प्रमाणांत त्याच्या सहकाऱ्यांचीही.

**प्रवाहाचे नावाडी कोण? :**

ह्या योजनेतील मुख्य 'पुरोहित' आहे 'अग्नि' आणि हा आहे एक अवाढव्य 'यज्ञ' वा 'आत्मयज्ञ'.

त्यामुळेच ऋग्वेदातील प्रथम वाक्य व सुक्त आहे-
**''ॐ अग्निमीळे पुरोहितम् यज्ञस्य देवमृत्विजम्।''**

**वेदांचा खरा अर्थ :**

**महायोगी अरविंद** आपल्या **Secrets in Vedas** ग्रंथात एव्हढ्या महत्वाच्या **'ज्ञानकुंजिका' (Key to knowledge)** चा अर्थ लावण्यांत जी **ऐतिहासिक चूक** झाली ती दुरूस्त करतात.

आतांपर्यत वेदातील सूक्ताचा अर्थ लावताना **सायणाचार्य** सारख्या भाष्यकारांच्या संप्रदायातील लोक हे ज्ञान केवळ **'यज्ञ समारंभाचे वर्णन'** करणारे असा विश्वास दाखवितात.

उलट अरविंद म्हणतात कीं ह्यातील **'अग्नि'** ही देवता ही काय एक जडाग्नि अगर प्रकाश किंवा उष्णतत्वासारखी भौतिक चीज आहे काय, असूं शकेल काय? मग तिच्या कडून पुढे व्यक्त केलेली वर्णने काय दर्शवितात?

अग्नि सत्याचा पालक आहे, जो आपल्या कृतीत द्युतिमयता उत्पन्न करतो.

ज्याची इच्छाशक्ती ही दैवी ज्ञान असलेली व त्याची स्फूर्ती ताब्यात ठेवणारी अशी दृष्टी आहे. तो सत्याचे पालन करतो, श्रेयस असे ज्ञान उत्पन्न करतो. निरनिराळी जगांना साधणारी ती शक्ती आहे. ती शक्ती नेहमी पूर्ण ज्ञानाने काम करते. ती अग्निशक्ती **'जातवेदस्'** आहे म्हणजे **सर्वजन्म माहीत असणारी आहे.**

**'विश्वानि व युनानी विद्वान - 'सर्व अविष्कार अगर सृष्टी ज्ञान असलेली व दैवी ज्ञानाचे सर्व प्रकार ज्ञात असलेली असते.**

शिवाय असे लागोपाठ वेदात म्हटलेले आढळते कीं देवांनी अग्नीची स्थापना मर्त्य मानवांत अमरत्व म्हणून, त्याच्यातील दैवी शक्ती म्हणून, मानवास आपणास करावयाच्या कार्याची शक्ती म्हणून केलेली आहे.

त्यामुळे हा (अग्नि) या 'वैश्विक यज्ञाचा' पुरोहित आहे. **त्याच्या ह्या सर्व क्रियेचा ज्या यज्ञात अंतर्भाव आहे तो 'यज्ञ' काय सामान्य मानवी 'काम्य यज्ञ' असू शकेल काय?**

या सूक्ताचा खरा गूढ अर्थ हा 'मानसशास्त्रीय आणि स्पिरीच्यूअल शक्ती क्रिया यांच्या संदर्भानेच लावावा लागेल. ही यज्ञ क्रिया आणि त्यांतील अग्नि, आज्य, समिधा, स्वाहाकार, हव्य व फलनिष्पत्ती यांना आध्यात्मिक अर्थच आहेत, हे उघड आहे.

**हा अग्नि 'कवी क्रतुः' आहे. याचा उघड अर्थ असा कीं ज्याची इच्छाशक्ती द्रष्टयाची आहे असा तो कार्य करतो.**

**अग्नि जवळ सत्य व ऋत दोन्ही आहेत. तो चित्त श्रवस्तमः आहे :**

या व इतर विशेषांचे गुण, सामर्थ्य असलेला हा अग्नि म्हणूनच ह्या विश्वयज्ञाचा पुरोहित आहे व त्या यज्ञातील अत्यंत गूढ पण विश्वहेतूचे काम करत असतो. या करिता त्याचे आवाहन केले जाते. या यज्ञात अर्थातच जड सृष्टी व अमरलोक यांच्या मध्ये गुणात्मक देवाण घेवाण होते म्हणून तो माध्यमही आहे.

मग एव्हढी गूढ यज्ञ कल्पना पूर्णपणे जाणून जर माणसाने श्रौत व स्मार्त - सामाजिक व वैयक्तिक यज्ञ वा अग्निहोत्रे केली तर विश्वाचा उद्देश व त्याचे खरे जीवन साफल्य होऊं शकेल, हे उघड आहे. ह्या रहस्यमय भूमिका प्रत्यक्ष साधनेत आणाव्या लागतील.

**अशी आहे भारतीय संस्कृती :**

**हा एव्हढा फाफट पसारा मी कां मांडला?** भारतीय संस्कृतीचा उगम ह्या वेदीक बीज संकल्पना मध्ये आहे. तिचा विस्तार 'यज्ञ क्रियेने' निसर्गातून होतो आहे. तो 'यज्ञ सामान्य बुद्धीला दिसत नाही. **पण, ह्याच यज्ञाचे गूढ अर्थ 'विष्णु सहस्त्रनामात'** अनेक **संकल्पना द्वारे** व **विशेष क्रमाद्वारे सांगितले आहेत.**

हे विष्णुसहस्त्रनाम इच्छामरणी भीष्माचार्यांनी हे जग




**ॐ वषटकाराय नमः।**

सोडतांना महाभारतात शेवटी युधिष्ठिराला उपदेश म्हणून सांगितले. ते ही भगवान कृष्णाच्या आग्रहाखातर.

हे जनमेजयाला ऋषी वैशंपायनानेही सांगितले होते. गूढार्थाने खरे तर मानवाला !!

**विश्वस्मै नमः। वषट्‌काराय नमः। योगाय नमः।**

**विश्वरेतसे नमः। संवत्सराय नमः। सर्व योगविनिः सृताय नमः।**

**वगैरे जी विष्णूची नावे** आहेत असे म्हणून म्हटली **जातात ती 'अर्थानुसंधान पूर्वक' जाणली पाहिजेत. या विश्वयज्ञाचे हे खरे अर्थ आहेत.**

कारण, ह्या संकल्पना, ज्या यज्ञाशी जोडल्या आहेत, त्यांची देवता **'विष्णू'** आहे. तोच **'विश्वयज्ञ'** कर्ता आहे हे सर्व विश्व ह्या यज्ञात सहभागी आहे.

त्यामुळे भारतीय संस्कृती ही या बीजसंकल्पना व हे मॉडेल व ह्या व इतर साधना यावर आधारलेली आहे. ती कांही एक विस्कळीत, योजना असलेली, अशी नव्हे. ह्या संस्कृतीच्या प्रवाहाची धारणा वेदामध्ये सूत्र रूपाने विशद

केली आहे. ती अगम्य आहे कोणाला? ज्या मानवाने स्वत:च्या ज्ञानमर्यादांचे संकुचित रूप जाणले - प्राणी स्वरूप जाणले - त्याची आत्मिक, नैतिक वाढ होऊन जर त्याने हे अव्यक्त जगांतले संस्कृतीचे बीज जाणले, तर त्याला स्वत:च्या खऱ्या अस्तित्वाची ओळख होईल. जर नापास झाला तर प्राणी ह्या अवस्थेतच जीवन संपेल. व कपाळी त्याच अवस्थेत जन्म, जरा, मरण भोगत ओढाताण होत राहील.

उलट, हे जीवन एक वैश्विक आत्मोन्नतीची अपूर्व संधी आहे असा विचार जाणला - जो बीजस्वरूपांत आहे- तर त्याला, ह्या दिव्य वैश्विक संस्कृतीच्या प्रवाहात नेतृत्वाचा अधिकार मिळू शकेल.

आपण, थोडक्यात भारतीय संस्कृती- बीज, मॉडेल व साधनांचे चित्र जाणले.

ह्या विषयांतील पुढील गूढ बारकावे आपण दिशाच्या पुढील अंकात जाणणार आहोत.

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे
Tel. 25368450
E mail : yrsane@eth.net

•••

*अजब कहाण्या शोधांच्या*

**जीन्स**

तरूण मुलामुलींमध्ये निळया रंगाच्या तंग जीन्स वापरण्याची फॅशन आता सर्रास रूढ झाली आहे. जेकब डब्ल्यू डेव्हिस (कॅलिफोर्निया) याने या जिन्सच्या बाजूला असणाऱ्या पाकिटांना धातूचे रिव्हेटस लावण्याची पद्धत सुरू केली आणि लेव्ही स्ट्रॉस या तयार कपड्यांच्या कारखानदाराने त्याचे पेटंट घेतले (१८७० व १८७२)

मुख्यपृष्ठावरून
संपादकीय

**प्रश्नांची तीव्रता वाढत आहे**

एकीकडे माज आलेली, या साधनसंपत्तीचा सर्वयैव गैरव्यापार करणारी मंडळी आहेत आणि दुसरीकडे या मंडळींकडे पूर्णपणे कानाडोळा करणारी भ्रष्ट शासन पद्धती आहे. यात सामान्य, करदात्या नागरिकाचे जीवन कठीण होत चालले आहे. अपारंपरिक उर्जास्रोत, पर्जन्य शेती या किंवा अशा विषयांबाबत टाळ्या घेणारी भाषणे करणारे अभ्यासक खूप आहेत. जगभरच यावर संशोधनही विपुल प्रमाणात चालू आहे. यातील बरेच संशोधन स्वार्थप्रेरित आहे. जोवर या संशोधनांच्या उपयोजनांच्या अंगाने विचार केला जात नाही, यातील निष्कर्षांचा वापर केला जात नाही तोवर परिस्थितीतील बदल कसा संभव आहे? यावर काही कृती करणाऱ्या, काही काम करू पाहणाऱ्या संस्था आहेतही, पण त्यांचे अस्तित्व उपेक्षित आहे. संबंधित शासनच अशी उपेक्षा करत असलेले दिसते. भ्रष्टाचाराची प्रेरणा या प्रयत्नांतील सर्व जीव नाहीशी करतो.

अशा विलक्षण स्थितीत समाजातील प्रत्येक घटकाने अत्यंत जबाबदारीने वागण्याची गरज आहे. कारण सतत वाढणारी लोकसंख्या, पर्यावरणाचे कधीही भरून न येणारे आपणच केलेले नुकसान, निरक्षरता आणि अज्ञान, नागरी जाणीवांचे बोथटपण अशा अनेक टांगत्या तलवारी घेऊन आपण जगत आहोत!

•••

**आपण वर्गणी भरली का!**
**नसल्यास**
**कृपया आमच्या**
**कार्यालयात भरावी.**

## पासष्टीतील अभिव्यक्ती

### निवृत्तीनंतरच्या जीवनशैलीचे संस्कार तारुण्यातच करून घ्यायला हवेत!

*आचार विचारात कितीही भिन्नता असली तरी माझ्या जडण - घडणीत गुरुवर्य भ.ग. बापटांची भूमिका निश्चितच महत्वाची आहे. दर वेळी आमची भेट झाली की अनेक विषयांवर चर्चा होते. माझ्या विविध उपक्रमांबद्दल माहिती देऊन झाल्यावर त्यांचे दर वेळी निक्षून सांगणे असते, ''सिंगवी रोजची दैनंदिनी लिहून या सगळ्या गोष्टी आणि घटनांची नोंद ठेवता की नाही? संस्था अथवा अशा उपक्रमांचा इतिहास लिहिला जातो तेव्हा या नोंदींना खूप महत्त्व असते. इंग्रजांनी करून ठेवलेल्या अशा नोंदीमुळेच आज आपला इतिहास काही प्रमाणात का होईना, आपल्यासमोर येत असतो. तुमच्याकडे लिहिण्यासारखे खूप आहे. लिहीत राहा आणि मधून मधून पाठवीत जा.''*

*''नित्य नियमाने होत नाही. परंतु, काही महत्वाच्या घटनांची नोंद करून ठेवीत असतो'' असे उत्तर मी देत असलो, तरी त्यांत फारसे तथ्य नसते. वेळोवेळी वेगवेगळ्या विषयांवर लिहीत आलो असलो तरी त्यात अशा घटना, प्रसंग अथवा व्यक्तींचा उल्लेख अथवा संदर्भ नसतो - काळाच्या ओघात मग त्या घटना आणि ते संदर्भ विसरले जाण्याची त्यामुळे खूप शक्यता असते. आपल्या अशा लिखाणातून कोणाचे मन तर दुखावले जाणार नाही ना? आपल्या कार्यावर त्याचा विपरीत परिणाम तर होणार नाही ना? आपल्यावर आत्मश्लाघेचे आरोप तर होणार नाहीत ना? असे लिहिण्याचा आपला अधिकार तो काय? आपल्यापेक्षा कर्तृत्व, अनुभव आणि वयाने श्रेष्ठ असणाऱ्या आपल्याच परिचयातील अनेक व्यक्तींनी अजून कुठे त्यांचे अनुभव आणि विचार व्यक्त करून ठेवलेले आहेत.'' असे नाना प्रश्न नाकर्त्या मनासमोर उभे ठाकतात मग काहीशी भीड, काहीसा संकोच आणि खरे म्हणजे - बराचसा कंटाळा - यामुळे या नोंदी करायच्या राहून जातात. ठरावीक काळानंतर त्या आठवणी पुसल्या तरी जातात किंवा पुसटशा तरी होतात. त्यांचा संदर्भ सुटतो. काही वेळा त्या कालबाह्य ठरतात. तर काही वेळा त्या वेळच्या वेळी व्यक्त न केल्यामुळे जे नुकसान, हानि अथवा गैरसमज होऊ नयेत असे वाटते, होऊन गेलेले असतात! त्यानंतर त्या घटनांचा उल्लेख करण्यात काही अर्थ नसतो; केला तरी लोकांचा त्यांवर विश्वास बसेनासा होतो.*

*आणि मग आता किती दिवस हे असेच चालत राहणार? वयाच्या पासष्टीत आल्यावर आपण या घटना, त्यांचा अन्वयार्थ त्याचबरोबर आपल्या सामाजिक, राजकीय आदी परिस्थितीवर होणारा परिणाम याविषयी आपले विचार व्यक्त करणार नसलो तर मग करणार तरी केव्हा? सगळ्याच गोष्टींच्या आजवर लिखित नोंदी ठेवल्या नसल्या तरी आपल्या 'हार्ड डिस्क' वर ज्या कायमच्या कोरल्या गेल्या आहेत, त्यांना आपण आता तरी शब्दांकित करून ठेवायला नको का?*

*याच विचारातून लेखांकित करीत आहे. आयुष्यातील वेगवेगळ्या टप्प्यावर घडलेल्या घटना, आपल्यावर झालेला त्याचा परिणाम, सभोवतालची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि कौटुंबिक परिस्थितीत दिसून येणारी वैगुण्ये तसेच श्रेष्ठा, अनेक व्यक्तींच्या दिव्यत्वाची आलेली प्रचिती, त्यावरील भाष्य हे नव्हे एखादे आत्मचरित्र. ही नव्हे कोणावरील टीका. ही नव्हे आत्मश्लाघा. हा नव्हे उपदेश. हा नव्हे कल्पनाविलास. हा नव्हे इतिहास. नव्हेच हा एखादा घटनाक्रम.*

*ही तर केवळ एका विशिष्ट वयातील विचारांची अभिव्यक्ती! मुरलेल्या लोणच्यासारखी! आपण त्याचे नामांकन करू या - ''पासष्टीतील अभिव्यक्ती!''*

अर्थार्जन मिळवून देणारा आपला व्यवसाय, कामधंदा अथवा नोकरी यातून कधी निवृत्ती घ्यावी किंवा नाही; घेतल्यास ती वयाच्या कुठल्या टप्प्यावर घ्यावी; आणि ती तशी घेतल्यावर आपण पुढील आयुष्यात काय आणि कसे करावे अथवा त्यानंतरची आपली जीवनशैली आणि दिनचर्या कशी असावी, याचा निर्णय हा प्रत्येकाने आपला आपणच घ्यायचा असतो. त्यासाठी आपल्या कुटुंबातील आपल्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना विश्वासात घेणे, आपल्या स्वत:च्या आणि त्यांच्याही आर्थिक गरजा लक्षात घेणे, आपली विद्यमान आर्थिक परिस्थिती, रुपयाचे सातत्याने होत जाणारे अवमूल्यन आणि तेवढयाच सातत्याने वाढत जाणारी महागाई या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करणे आवश्यक असते.

आपली मुलं-बाळं कितीही गुणी आणि मातृ-पितृ-भक्त तसेच कमवती असली, तरी आपल्या किमान आर्थिक गरजा भागविण्यासाठी आपल्याला त्यांच्याकडे हात पसरायला लागणार नाहीत याची काळजी घेणे खूप आवश्यक असते. आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत आपल्याला स्वाभिमानाने जगता येईल असे, छोटेसे आणि साधेसे असले तरी चालेल, असे निवासस्थान असणे खूपच आवश्यक असते. माझ्या आपण या शब्दप्रयोगात 'पती-पत्नी' हे दोघेही अभिप्रेत आहेत. हे झाले अर्थकारणासंबंधी!

त्याचबरोबर निवृत्तीनंतरचा आपला वेळ आपण कसा घालविणार आणि स्वत:ला कसे गुंतवून ठेवणार याचाही पूर्ण विचार करून ठेवणे आवश्यक असते. विशेषत: नोकऱ्यांमधून पूर्ण कार्य मर्यादेच्या आधी निवृत्ती स्वीकारणाऱ्यांनी याचा विशेषच विचार करायला हवा. रग्गड पैसा मिळतो म्हणून मौजमजा करण्याच्या उद्देशाने अवेळी निवृत्ती स्विकारल्यानंतर ''वेळ जात नाही'' म्हणून खंत करीत आजारी पडलेल्या लोकांची अनेक उदाहरणे आपल्याला अवती-भोवती बघायला मिळतात! आपल्यावर अशी वेळ येऊ नये म्हणून आपल्या आवडीच्या विषयात समाजाला उपयुक्त होईल असे समाजकार्य अथवा स्वत:ला आणि इतरांना आनंद मिळवून देतील असे चांगले छंद स्वत:ला लावून घेऊन ते जोपासणे खूप महत्त्वाचे असते.

माझ्या वेगवेगळ्या उपक्रमांविषयी माहिती जशी लोकांच्या ऐकण्यात अथवा वाचण्यात येते, तशी हे लोक जेव्हा मला भेटतात तेव्हा मुद्दाम कौतुकाने सांगतात - ''छान चालले आहे हो तुमचे काम! मला पण असेच खूप करण्याची इच्छा आहे. आता पुढील दोन वर्षानंतरच मी निवृत्त होणार आहे. मग मी दिवसातील किमान दोन तास तरी तुमच्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी राखून ठेवणार आहे. सांगा तुम्ही माझ्या जोगते काहीही काम असले तर. आता मात्र अजिबात वेळ नसतो हो !''

''छान! अवश्य या हो ! आम्हाला हवाच आहे आपला अनुभव आणि मार्गदर्शन !'' त्यांना न दुखविता मला सांगावे लागते। एक मात्र खरे कीं, अशा लोकांकडून कधीच, कुठल्याही प्रकारचे समाजकार्य होण्यासारखे नसते. समाजकार्य हे काय अशी कुठही वेळेची फूटपट्टी लावून करण्यासारखे असते? कीं फावल्या वेळेत करायची उठाठेव असते?

खरे म्हणजे, ती असते एक नैसर्गिक प्रवृत्ती. स्वभावधर्माचा एक अविभाज्य भाग! त्यासाठी किमान थोडे तरी बाळकडू घेणे आवश्यक असते. किमान आपल्या तारुण्यात तरी तसे संस्कार जाणीवपूर्वक करून घेणे आवश्यक असते. मनाची संवेदनशीलता कायम जपावी लागते. निसर्गाकडे कान, नाक, डोळे उघडे ठेवून बघावे लागते तसेच सातत्याने विद्यार्थ्याच्या भूमिकेतून वावरत राहावे लागते. सभोवताली होत राहणारा अन्याय, पीडा आदिंनी मन अस्वस्थ होणे आवश्यक असते. समोर दिसत असलेल्या प्रश्नांनी बावरून न जाता, त्यांवर उत्तरे शोधण्याची क्रियाशीलता आणि धडाडी दाखवावी लागते.

समाजकार्य हे सांघिकरीत्या केले तर अधिक प्रभावी होते. त्यासाठी एकमेकांशी जमवून घेण्याची, तडजोडीची वृत्ती लागते. जे गुण आपल्याकडे नाहीत पण इतरांकडे ते दिसतात, ते त्यांच्याकडून शिकण्याची, त्यांचे नेतृत्व स्विकारण्याची तयारी दाखवावी लागते. अहंभाव सोडून विनम्रपणे काम करावे लागते.

मात्र त्याचवेळी आपल्या कामावर आणि तत्वांवर आपली ठाम निष्ठा असली, प्रामाणिक विश्वास असला, तर त्यासाठी कोणी बरोबर नाही आला, तर ''एकला चलो रे!'' च्या भूमिकेतून वाटचाल करीत राहाण्याची देखील तयारी ठेवावी लागते. तसेच कुठल्याही प्रकारच्या परताव्याची अपेक्षा न ठेवता, पदरचा वेळ, पैसा आणि श्रम खर्च करण्याची मानसिक तयारी आणि क्षमता जोपासण्याची आवश्यकता असते. एवढे करूनही, नाना प्रकारचे आक्षेप, टीका, दोषारोप आदीचे धनी व्हायची देखील तयारी ठेवावी लागते!

हे काय केवळ निवृत्तीनंतर शिकण्याचे अथवा जोपासण्याचे कार्य असते? आपल्या मुलांनी मोठे झाल्यानंतर त्यांचे व्यक्तिमत्त्व उमदे व्हावे, त्यांच्यात चांगले उत्पन्न मिळविण्याची क्षमता निर्माण व्हावी, यासाठीचे संस्कार आणि शिक्षण जसे आपण लहानपणापासूनच त्यांना द्यावे लागते, तसेच हे संस्कार देखील आपणच आपल्यावर आयुष्याची वाटचाल करीत असतांना करून घ्यावे लागतात. कोणास ही प्रेरणा चांगल्या पुस्तकांच्या वाचनातून मिळते; कोणास एखाद्या यशस्वी, कर्तृत्ववान, सेवाभावी नेत्याकडून अथवा त्याचे चरित्र वाचून मिळते; तर कोणास गुरूस्थानी मानलेल्या एखाद्या साधू-महात्म्याकडून!

एक मात्र खरे कीं, निसर्गाएवढा चांगला गुरू जगात दुसरीकडे कुठे आढळून येत नाही. तसेच डोळस निरीक्षण शक्तीपेक्षां अध्ययनाचा अधिक चांगला मार्ग दिसून येत नाही. त्याचबरोबर संवेदनशील आणि संस्कारक्षम मनापेक्षा आपले व्यक्तिमत्त्व घडविण्याचे अधिक चांगले माध्यम असू शकत नाही. शालेय जीवनापासूनच वेगवेगळे उपक्रम, भटकंती, सभासमारंभ आदींमधून भाग घेत राहाणे खूपच आवश्यक असते. लेखन-वाचन आदीची आवड त्यातूनच निर्माण होते. त्यातूनच आपल्याला कुठल्या विषयात अधिक रस, गोडी आणि गती आहे हे आपल्याबरोबरच इतरांच्याही लक्षात येते. त्यांतूनच मग आपल्याला स्वत:ची ओळख होत आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या प्रक्रीयेला चालना मिळते. नुसत्याच परीक्षेतील गुणांच्या टक्केवारीच्या विळख्यात अडकलेले विद्यार्थी आणि पालक यांच्या लक्षात या गोष्टी कशा येत नाहीत याचे मला सतत आश्चर्य वाटते. आपल्या परीक्षा पद्धतीत विद्यार्थ्यांच्या संर्वागीण व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन न होता, त्या त्या परीक्षेत विषयावर त्या विवक्षित दिवशी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना ते विद्यार्थी किती चांगली अथवा वाईट उत्तरें देतात याचेच फक्त परीक्षण होत असते. ते देखील एखाद्या त्रयस्थ आणि अनोळखी व्यक्तीकडून! त्यामुळे वेगवेगळया कारणांमुळे त्यांत बरीच गफलत होत राहाण्याची शक्यता असते. अलीकडे तर या परीक्षण पद्धतीत अनेक अप्रवृत्तींचा शिरकाव झाल्याचे देखील आपल्या वाचनात, बघण्यात आणि अनुभवण्यात येत असते. आपल्या पाल्यांना केवळ अशा तत्वांच्या हवाली करण्याची चूक जे पालक करतात ते आपल्या पाल्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या आड येतात असे मला वाटते.

शालेय जीवनापासूनच विविध क्षेत्रातून वावर करणाऱ्या विद्यार्थ्यांना आयुष्याच्या वेगवेगळया टप्प्यांवर वेगवेगळया प्रकारच्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतात. आपले व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी अशा जबाबदाऱ्या स्विकारण्याची मानसिक तयारी ठेवणे आवश्यक असते. कारण अशा संधींमधूनच आपल्या मधील नेतृत्व गुणांना वाव मिळत राहून आपला आत्मविश्वास बळकट होत

आपली एका समर्थ व्यक्तिमत्त्वाकडे वाटचाल होत राहाते. आपल्या मार्गात येणाऱ्या अडचणींना सामोरे जात त्यावर मात करण्याची कला अवगत होते. काही वेळा येणाऱ्या अपयशामुळे खिन्न व्हायला झाले तरी डगमगून जायला होत नाही. अनेक कुटूंबांमधून या गोष्टींकडे साफ दुर्लक्ष केले जाते. आपल्या पाल्यांना ''तू उगाच ती जबाबदारी अंगावर घेऊ नकोस.'' ''तू अंगाला लावून घेऊ नकोस'' ''तू फक्त आपल्या अभ्यासाकडे लक्ष दे.'' ''पुढचे वर्ष १० वी चे ना? मग तूं आत्तापासूनच त्या तयारीला लाग!'' अशा प्रकारचा सल्ला दिला गेलेला जेव्हा कानांवर पडतो तेव्हां मला खूप वाईट वाटते! अशातून आपले पाल्य कधीच नेतृत्वक्षम होंऊ शकणार नाहीत हे आम्हा पालकवर्गाच्या लक्षात कसे येत नाही?

माझ्या लहानपणातील एका छोट्याशा घटनेचा उल्लेख करणे अपरिहार्य समजतो. धुळे जिल्ह्यातील फागणे या छोट्याशा गावातील, त्या वेळच्या लोकल बोर्डाच्या शाळेत शिकत होतो. मराठी माध्यमातील इ.४ थी चा निकाल होता. शाळेत आणि वर्गात उत्साहाचे वातावरण होते. आमचे वर्गशिक्षक श्री. परीट गुरुजी हेच शाळेतील एका छोट्याशा कपाटात मावतील एवढ्या सुमारे दोन एकशे पुस्तकांच्या वाचनालयाची जबाबदारी देखील सांभाळत असत. परीक्षेचे निकालपत्र आणि प्रगतीपुस्तक घ्यायला गुरुजींच्या टेबलाजवळ गेलो असता त्यांच्या टेबलावर पडलेल्या, रंगी-बेरंगी मुखपृष्ठ असलेल्या सुमारे ३०-४० पुस्तकांवर नजर गेली. दर्यावर्दी सिंदबादच्या सात सफरी आणि इतर सुंदर, सुंदर गोष्टी आणि कादंबऱ्या असलेली ती पुस्तके होती. आता सुट्टीत आपल्याला ती वाचायला मिळणार म्हणून मन मोहरून आले. गुरुजींचे निकालपत्रिका वाटून झाल्यानंतर त्यांना मोकळे झालेले बघितले. इतर दोघा-तिघा मित्रांसोबत त्यांच्या टेबलाशी गेलो. भीत-भीतच गुरुजींना विचारले, ''गुरुजी आम्हाला आता ही पुस्तके केव्हा वाचायला मिळणार?'' गुरुजी म्हणाले, ''आजच ती आली आहेत. त्यांची नोंद करून झाल्यानंतर त्यांचा ताबा मुख्याध्यापकांकडे दिल्यानंतर मी माझ्या गावी जाणार आहे. जूनमध्ये शाळा पुन्हा उघडल्यानंतर त्यांचा ताबा घेऊन झाला कीं मग साधारणतः जुलैपासून ती तुम्हाला मिळू शकतील.''

आमचे मन खट्टू झाले. ''गुरुजी, उद्यापासून शाळेला सुट्टी लागते आहे. सुट्टीतील दोन महिने आमच्याकडे भरपूर वेळ असणार आहे. त्यावेळी जर ही पुस्तके वाचायला नाही मिळाली तर आमचा वेळ नुसत्याच उनाडक्या करण्यात नाही जाणार का?'' हे आमचे म्हणणे गुरुजींनाही पटले. म्हणाले, ''मुख्याध्यापकांना भेटून बघा. सुट्टीत कोणी जबाबदारी घेणार असले तर मी गावाला जायच्या आधी पुस्तकांची नोंद करून कपाट त्यांच्या हवाली करतो.''

आमच्या मनात थोडी आशेची पालवी फुटली. तसेच मुख्याध्यापक श्री. जोशी गुरुजींकडे गेलो. पुन्हा भीत-भीतच गुरुजींशी झालेला आमचा संवाद त्यांच्याकानी टाकला. माझ्या आधीच्या कीत्येक पिढ्या त्याच शाळेत शिकलेल्या. वडिल आणि थोरल्या भावंडांना जोशी गुरुजी चांगले ओळखायचे आणि कुटुंबाच्या वाचनप्रियतेची त्यांना चांगलीच माहिती होती. वडिलांशी अनेक विषयांवर चर्चा होत असे. त्यांनी अर्ध्या चष्म्यातून वर बघत मिश्किलपणेच मला विचारले, ''सुट्टीत तर कोणीच शिक्षक उपलब्ध नाही. तू घेतोस काय जबाबदारी? एकही पुस्तक खराब झाले, तर पूर्ण किंमत भरावी लागेल. ही लोकल बोर्डाची शाळा आहे.''

मी क्षणभरच मित्रांकडे आणि नंतर गुरुजींकडे बघितले. एकमेकांशी नजरानजर झाल्यावर मला त्यांचे शब्द आणि नजरेतील आव्हान, खोच आणि एक प्रकारचा विश्वासही वयाच्या त्या १० व्या वर्षी लक्षात आला. कुठून बळ आले कुणास ठाऊक? मग मात्र, क्षणाचाही विलंब न

करतां मी अतिशय आश्वासक स्वरात उत्तर दिले. ''घेईन मी स्वत: ती जबाबदारी, गुरुजी. काय आणि कसे करायचे ते सांगा.''

गुरुजींनी पुन्हा एकवार माझ्याकडे अंत:करणाचा ठाव घेणाऱ्या नजरेने बघितले. त्यांना देखील कदाचित् त्याच उत्तराची अपेक्षा असावी. त्यांना देखील विद्यार्थी घडवायचा होता!

''बाहेर थांबा थोडा वेळ. मी परीट गुरुजींशी बोलतो आणि मग पुन्हा तुम्हाला बोलवतो.'' केवढा धीर आला आम्हाला! परीट गुरुजींना बोलावण्यात आले. दोघांनी आपआपसात चर्च करून पुन्हा आम्हाला आत बोलावले.

''हे बघ, हे वाचनालय चालवायचे म्हणजे चेष्टा नाही. घरी जाऊन उद्या उत्तमशेट (माझे वडिल) कडून पत्र घेऊन ये कीं तू ही जबाबदारी घ्यायला त्यांची संमती आहे आणि कपाट अथवा पुस्तकांचे काहीही नुकसान झाल्यास ते भरून देतील म्हणून आणि ते जर हो म्हणाले तर परीट गुरुजींकडून सर्व नियम आणि पद्धतीची माहिती करून घेऊन कपाट तुझ्या जबाबदारीवर घरी घेऊन जा. शाळा पुन्हा सुरू व्हायच्या दोन दिवस आधी परत आणून गुरुजींकडे ताबा दे.''

त्यावेळी होत राहणाऱ्या आंतरवर्ग कबड्डी सामना जिंकण्याचाच आनंद आम्हाला झाला! आता वडिलांशी बोलून त्यांची परवानगी आणि पत्र मिळविणे म्हणजे आंतरशालेय सामना खेळण्याचा दुसरा टप्पाच जणू होता! या काळात (१९५०-५५) वडील अथवा गुरुजींशी कुठल्याही कारणासाठी बोलावे लागले तर भीत-भीतच तोंड उघडावे लागे! केव्हां तुसडेपणाने तुमच्यावर कुठल्या प्रकारचे शाब्दिक प्रहार होतील ते सांगता येत नसे! आज हीच परिस्थिती उलट झालेली आहे!

जबाबदारी पेलवेल का म्हणून वडिलांनी विचारले. कपाट कुठे ठेवून देवाण-घेवाणीचे उपद्व्याप होणार आहेत हे देखील त्यांनी जाणून घेतले. ''ठीक आहे; जोशी गुरुजी मला संध्याकाळी भेटतील तेव्हा मी त्यांच्याशी बोलून घेतो. उद्या शाळेत जाताना पत्र आणि बैलगाडी घेऊन जा आणि कपाट नीट जपून घेऊन ये.'' हा देखील सामना जिंकून झाला! वडिलांनी देखील आपल्याला ती पुस्तकें सगळ्यांच्या आधी वाचायला मिळणार म्हणून हवीच होती! लेक आपल्यावरील जबाबदारी कशी पार पाडतो ते बघायचेच होते. नाही कसे म्हणतील!

पुढचे सगळे सोपस्कार पार पडले. शाळेतून विद्यार्थ्यांमार्फत घरोघर निरोप पोहोचले. एरवी शाळेतून पुस्तकें न घेणारे देखील सुट्टीत त्या पुस्तकांवर तुटून पडले! आम्ही साऱ्यांनीच ती पुस्तकें शाळा सुरू होण्याआधीच अधाशासारखी वाचून काढली. देवाण घेवाणीची व्यवस्थित नोंद झाली. एकाही पुस्तकाचे एकही पान फाटले नाही. आधीच्या संबंध वर्षात नव्हती एवढ्या वाचकांची नोंद या दोन महिन्यांमध्ये झाली. एक आगाऊपणा मी माझ्या स्वत:च्या जबाबदारीवर केला होता तो असा कीं ज्या घरातील एकही पाल्य शाळेत जाणार नाही अशा पालकांना देखील मी पुस्तके वाचायला देऊन वाचनक्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला. सर्व काही व्यवस्थित झाल्यामुळे कोणाचा कुठलाही आक्षेप आला नाही. त्यातूनच मला स्वत:च्या जबाबदारीवर निर्णय घेत राहाण्याचे बाळकडू मिळाले.

ठरल्याप्रमाणे शाळा सुरू व्हायच्या दोन दिवस आधी पुस्तकांचे कपाट शाळेत पोहोचले. जोशी गुरुजी आणि परीट गुरुजींचे शाबासकीचे हात पाठीवर पडल्यावर कबड्डीचा अंतिम सामना जिंकून कप हातात पडल्याचे समाधान मला आणि माझ्या मित्रांना झाले. ही मुहूर्तमेढ होती. त्यानंतरच्या आयुष्यात मी कधीही, कुठल्याही क्षेत्रातील जबाबदारी अंगावर घेण्याचे टाळले नाही. तसेच ती स्वीकारल्यानंतर सर्वस्व ओतीत ती पार पाडण्याचे

प्रामाणिक प्रयत्न करीत आलो.

आज माझे वडिल हयात नाहीत. विकलांग अवस्थेत असलेल्या जोशी गुरुजींना त्यांच्या या विद्यार्थ्याचा खूपच अभिमान आहे! परीट गुरुजींची मात्र काही माहिती नाही. माझ्या त्यावेळच्या मित्रांना घरच्या परिस्थितीमुळे शाळा अर्ध्यातूनच सोडायला लागली. माझ्या हार्ड डिस्कवर मात्र ती घटना कायमचीच कोरली गेली आहे. पुढील आयुष्यात एक व्यावसायिक चार्टर्ड अकाउन्टन्ट, प्राध्यापक, उद्योजक, वेगवेगळ्या संस्था आणि उपक्रमांचा प्रवर्तक, संपादक, लेखक, चित्रवाणी कार्यक्रम सादरकर्ता अशा वेगवेगळ्या भूमिका निभावताना ''आता आपले कसे होईल?'' अशी भीती मला कधीच वाटली नाही. किंवा निवृत्तीनंतर आपला वेळ कसा जाईल असाही प्रश्न कधी पडला नाही.

छे! छे! आपल्याला आवडणाऱ्या गोष्टीच केवळ करीत राहाण्यासाठी व्यावसायिक यशाच्या शिखरावर असतानाच मोठ्या आनंदाने वयाच्या ५५ व्या वर्षीच त्यातून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. आणि आज या व्यावसाईक यशाची तमा ना बाळगता स्वानंदाच्या झोक्यावर हिंदकाळत आहे. !

म्हणूनच म्हणतो, बालांनो आणि तरुणांनो, निवृत्तीनंतरच्या जीवनशैलीचे संस्कार तारुण्यातच करून घ्या !

**श्री. पुनम सिंगवी**
फ्लॉवर व्हॅली, नारळी पाडा,
ठाणे ४०० ६०१.
email - punamsingavi@mtnl.net.in

●●●

## वाग्दान (वाङ्‌निश्चय)

ब्राह्मविवाहांत वाग्दानविधी करावा लागतो. वधू आणि वर ह्यांच्या पालकांनी परस्परांना विवाहविषयक वचन देणे हा ह्या विधीचा प्रमुख उपयोग आहे. ह्याकरिता विवाहयोग्य अशा शुभकाली वरपक्षाकडील दोन, चार, आठ किंवा ह्याहून अधिक पण समसंख्याक गृहस्थ चांगला पोषाख केलेले आणि तितक्याच वस्त्रलंकारयुक्त सुवासिनी ह्यांनी वधूच्या घरी जावे. वराने त्यांच्याबरोबर गेले नाही तरी चालेल आणि बहुधा वराने न जाण्याचीच पद्धती आहे. ही मंडळी कन्यापित्याच्या घरी गेल्यानंतर ह्या वाग्दानविधीला प्रारंभ होतो. त्यासाठी वस्त्रालंकारांनी विभूषित अशी कन्या चांगल्या वस्त्राच्छादित पाठावर पूर्वेकडे मुख करून बसवावी. वरपक्षीयांनी नारळ व विडा कन्येच्या हाती द्यावा आणि त्यांनी पूर्वाभिमुख किंवा पश्चिमाभिमुख बसून अभष्टि.

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

आजारपणाचे मुख्य कारण चुकीचा व फाजील आहार होय !

# परिसरवार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्रा.वि.)

प्राथमिक शाळेतील पाच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली असून शाळेचा निकाल १०० टक्के लागला. शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे -

| नाव | गुण (३०० पैकी) |
|---|---|
| चि. अभिषेक राजेंद्र ठाकूर | २८६ जिल्ह्यात ७ वा |
| चि. स्वानंद रवींद्र बेहेरे | २८४ जिल्ह्यात ८ वा |
| चि. ऋतुराज हर्षल सुतार | २८४ जिल्ह्यात ८ वा |
| चि. मयंक गणेश शेटे | २८२ जिल्ह्यात ९ वा |
| कु. दिपाली सूर्यकांत गद्रे | २८० जिल्ह्यात १० वा |

या विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कल्याणी वाघरे, शिक्षिका - सौ. ललिता फिरके, सौ. रश्मी धर्माधिकारी, सौ. गीताली अंबिके यांनी मार्गदर्शन केले.

चि. स्वानंद बेहेरे याला गणितात १०० पैकी १०० गुण मिळाले.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.)

✦ ३ फेब्रुवारी रोजी 'मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठ' मुंबई यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या 'मराठी शिष्यवृत्ती सराव परीक्षा २००८' मराठी विषयाच्या पाचव्या परीक्षेस इ. ७ वी च्या वर्गातून निवडक ५५ विद्यार्थी बसले होते. परीक्षेचा निकाल १००% लागला असून निकालाचा तपशील पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १) पेडणेकर प्रियांका संदीप | | महाराष्ट्रात १ ली |
| २) विशेष श्रेणी | - | १७ विद्यार्थी |
| ३) प्रथम श्रेणी | - | १९ विद्यार्थी |
| ४) द्वितीय श्रेणी | - | १२ विद्यार्थी |
| ५) उत्तीर्ण श्रेणी | - | ०७ विद्यार्थी |

✦ इ. १० वी च्या विद्यार्थ्यांच्या गुरवत्तावाढीसाठी उन्हाळी वर्ग १५ एप्रिल ते १५ मे पर्यंत घेण्यात आले. यात डॉ. आनंद नाडकर्णींनी 'व्यवसायाच्या नवीन वाटा' विषयावर मार्गदर्शन केले.

✦ इ. १ ली ते ७ वी च्या इंग्रजी व गणित विषयाचे 'आशय समृद्धी प्रशिक्षण' २५ एप्रिल ते ६ मे या कालावधीत घेण्यात आले. या प्रशिक्षणास सौ. धोत्रे, सौ. सावंत या गणित विषयासाठी, तर सौ. शेलार, सौ. झंझाड, सौ. सायली माने या इंग्रजी विषयासाठी उपस्थित होत्या. गणित विषयासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. देवघरे उपस्थित होते.

✦ 'इ. ७ वी पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षण' ५ जून ते १३ जून या कालावधीत घेण्यात आले. या प्रशिक्षणास सौ. लोखंडे व सौ. गोतावळे उपस्थित होत्या.

✦ २१ मे ते ३० मे या कालावधीत स्काऊट मास्तर श्री. पांचाळ यांनी स्काऊट - गाईडचे 'हिमालय वुड बॅज' हे प्रशिक्षण पुण्यातील भोर येथे पूर्ण केले.

✦ १ मे रोजी 'महाराष्ट्र दिनानिमित्त' श्री. प्रकाश राजे यांचे 'विचार एक दिशा' या विषयावर शिक्षकांसाठी व्याख्यान आयोजित केले. त्यांनी शिक्षकांसाठी मन:शांतीचे विविध उपाय सांगून त्याचे प्रात्यक्षिक शिक्षकांकडून करवून घेतले. यास सर्व शिक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

✦ प्रयोगशाळा सहाय्यक श्री. भोईर हे ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांना त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

✦ २३ जून रोजी इ. ५ वी च्या सर्व विद्यार्थ्यांचे गोळ्या

वाटून स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास मान. मुख्याध्यापिका सौ. कळमकर, उपमुख्याध्यापिका सौ. देशपांडे व इ. ५ वी ला शिकवणारे सर्व शिक्षक उपस्थित होते. मान. मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, नियम व वर्तनाबद्दल मार्गदर्शन केले.

✦ माध्यामिक शिष्यवृत्ती दोन विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.

१) बहाडकर शुभम राजन - जिल्ह्यात २६ वा २४६/३००
२) कोयंडे शुभम अनिरूद्ध - जिल्ह्यात ३२ वा २४०/३००

✦ प्रणव प्रभाकर फिरके - १० अ या शालांत परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्याची तसेच प्रफुल्ल खेडेकर - ९ अ यांची मुलाखतीसाठी निवड झाली.

✦ इ. ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी २७ एप्रिल रोजी झालेल्या एम्.टी.एस्. परीक्षेत (वाडीया कॉलेज, पुणे) प्रफुल्ल खेडेकर - ९ अ अद्वैत इनामदार - १० अ यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

✦ अजित काळभोरने पुढील प्रमाणे यश संपादन केले.

१) आय. पी. एम. या गणित परिक्षेत भारतातून २४ वा क्रमांक

२) एम. टी. एस. गणित परीक्षेत महाराष्ट्रातून ३६ वा क्रमांक

३) 'नॅशनल लेव्हल ओपन क्रॉस कंट्री चॅम्पीयनशिप वुमेन' ४ किमी रनिंगमध्ये प्रथम पारितोषिक

४) 'अभिरूची मंडळ' आयोजित छंद शिबिरात सहभाग.

✦ महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळ आयोजित गणित प्रज्ञा स्पर्धा परीक्षेत अक्षया जयंत पाटील, ५ ब हिला विशेष प्रावीण्य व गुणवत्ता संपादन केल्याबद्दल प्रशस्तिपत्रक व सिल्व्हर ट्रॉफी प्राप्त झाली.

✦ शालेय वर्ष २००८ - ०९ साठी शिक्षक प्रतिनिधी म्हणून श्रीमती आशा जोशी तर शिक्षकेतर प्रतिनिधी म्हणून श्री. साबळे यांची निवड झाली.

✦ राजर्षी शाहू महाराजांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त २६ जून हा दिवस जन्मदिवस 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला. या कार्यक्रमात मा. मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांनी प्रास्ताविक केले. उपमुख्याध्यापिका सौ. देशपांडे, पर्यवेक्षक श्री. गवई यांनी शाहू महाराजांसंबंधीचे विचार व्यक्त केले. प्रमुख पाहुण्या सौ. गोतावळे यांनी शाहू महाराजांच्या जीवनपटाचा थोडक्यात आढावा घेतला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ. सुमिता माने यांनी केले. या दिनाचे औचित्य साधून निघालेल्या 'समता दिंडी'त इ. ७ क चे स्काऊटस् व गाईडस् तसेच स्काऊट मास्तर श्री. पांचाळ व गाईड कॅप्टन सौ. बोरवणकर हे सहभागी होऊन शाळेचे प्रतिनिधित्व केले.

✦ परांजपे विद्यालय, अंधेरी येथील सेवानिवृत्त भूगोलप्रेमी मान. श्री. शशी जुन्नरकर यांनी शाळेला भूगोलाचे नकाशे, तक्ते व काही शैक्षणिक साहित्य स्नेहभेट म्हणून दिले.

✦ मेहता मित्र मंडळ, डोंबिवली यांच्यातर्फे दिला जाणारा कै. कैलासभाई मेहता आणि कै. पुष्पलता मेहता पुरस्कार यंदाच्या वर्षी तन्मय जोशी, ६ वी याचे पालक ठाण्यातील सुप्रसिद्ध मेंदू विकार तज्ज्ञ डॉ. विनायक दत्तात्रय जोशी यांना प. पू. स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांच्या शुभहस्ते देण्यात आला.

✦ शाळेचा शालांत परीक्षा मार्च २००८ चा निकाल <u>९६.६६%</u> लागला. २७० पैकी २६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

शाळेतील गुणानुक्रमे पहिले १० क्रमांक व विषयातील १ ल्या क्रमांकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**गुणानुक्रमे प्रथम १० क्रमांक :**

| विद्यार्थ्याचे नाव | गुण | टक्के | गुणानुक्रम |
|---|---|---|---|
| फिरके प्रणव प्रभाकर | ६२३ | ९५.८४ | १ |
| शिंदे प्राजक्ता बाबासाहेब | ६१३ | ९४.३० | २ |
| काकडे रोहित रविंद्र | ६१० | ९३.८४ | ३ |
| जाधव श्वेता अशोक | ६०९ | ९३.६९ | ४ |
| सावंत पूजा प्रदीप | ६०५ | ९३.०७ | ५ |
| मांडवगणे प्राजक्ता अजित | ६०५ | ९३.०७ | ५ |
| खानविलकर संकेत राजेंद्र | ६०५ | ९३.०७ | ५ |
| दळवी नंदकिशोर मोहन | ६०३ | ९२.७६ | ६ |
| कुदळे वृषाली सुरेश | ६०३ | ९२.७६ | ६ |
| करवंदे योजना मारूती | ६०२ | ९२.६१ | ७ |
| रघोजीवार प्रसाद विजय | ६०१ | ९२.४६ | ८ |
| पाटील प्रशांत सुधाकर | ६०१ | ९२.४६ | ८ |
| वाघ अमेय हेमंत | ६०० | ९२.३० | ९ |
| सावंत जुई दत्ताराम | ५९९ | ९२.१५ | १० |

**विषयांतील सर्वप्रथम क्रमांक :**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण/पैकी | वर्ग |
|---|---|---|---|
| मराठी | सुकथनकर निकिता रविंद्र | ९२/१०० | १०अ |
| हिंदी | जंगम गौरी दिलीप | ८१/१०० | १० क |
| संस्कृत | फिरके प्रणव प्रभाकर | ९८/१०० | १०अ |
| | निंबाळकर निनाद प्रमोद | ९८/१०० | १०अ |
| इंग्रजी | जाधव श्वेता अशोक | ९४/१०० | १०अ |
| गणित | शिंदे प्राजक्ता बाबासाहेब | १५०/१५० | १०अ |
| विज्ञान | मांडवगणे प्राजक्ता अजित | ९८/१०० | १०अ |
| | फिरके प्रणव प्रभाकर | ९८/१०० | १०अ |
| | रघोजीवार प्रसाद विजय | ९८/१०० | १०अ |
| | शिंदे प्राजक्ता बाबासाहेब | ९८/१०० | १०अ |
| समाजशास्त्र | पाटील प्रशांत सुधाकर | ९८/१०० | १०अ |
| | काकडे रोहित रविंद्र | ९८/१०० | १० ब |

**निकालाचे श्रेणीनुसार वर्गीकरण :**

१. विशेष श्रेणी ७५% च्या वर - ९७ विद्यार्थी
२. प्रथम श्रेणी ६०% ते ७४% - ८४ विद्यार्थी
३. द्वितीय श्रेणी ४५% ते ५९% - ६६ विद्यार्थी
४. उत्तीर्ण श्रेणी ३५% ते ४४% - १४ विद्यार्थी

✦ १ जुलै रोजी ठाणे भारत स्काऊट गाईट तर्फे 'कृषिदिनानिमित्त' वृक्षदिंडीचे आयोजन केले. या दिंडीत इ. ८ वी चे २० स्काऊटस् व २० गाईडस्, स्काऊटमास्तर श्री. पांचाळ, गाईड कॅप्टन सौ. बोरवणकर सहभागी झाले.

✦ माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. आपल्या शाळेतून ४३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. निकाल ६६ टक्के लागला.

**शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी :**

१. बहाडकर शुभम् राजन २४६/३०० जि. २६ वा
२. कोयंडे शुभम् अनिरूद्ध २४०/३०० जि. ३२ वा

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक शाळा

### इयत्ता दहावी निकाल

**विशेष गुणवत्ता :**

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | टक्के | एकूण गुण |
|---|---|---|---|
| १ | रूचा गणपुले | ९६.४६ | ६०२+२५(Sports) |
| २ | शर्वरी गांगल | ९५.६९ | ५९७+२५(Sports) |
| ३ | रुचा कारखानीस | ९४.९२ | ६१७ |
| ४ | विराज सांघवि | ९४.१५ | ६१२ |
| ४ | मुळे मालविका | ९४.१५ | ६१२ |
| ५ | अश्विनी पावगी | ९३.५३ | ६०८ |
| ५ | ओजस गोहाड | ९३.५३ | ६०८ |
| ६ | सुरभी गोखले | ९३.२३ | ६०६ |



**शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांसह त्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका**

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | वृत्तीका शाह | ९३.०७ | ६०५ |
| ७ | अदित्य दामले | ९३.०७ | ६०५ |
| ८ | अक्षय भोसले | ९२.९२ | ६०४ |
| ९ | मंदार पाटील | ९२.७६ | ६०३ |
| १० | अखील नायर | ९२.४६ | ६०१ |
| १० | अनुकूल देशपांडे | ९२.४६ | ६०१ |
| १० | गौरीश नाडकर्णी | ९२.४६ | ६०१ |
| १० | प्रथमेश कर्वे | ९२.४६ | ६०१ |

**सर्वप्रथम गुणवत्ता :**

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | गुण |
|---|---|---|
| इंग्लीश | ओजस गोहाड | ८९ |
| संस्कृत | अलोक जोशी | ९८ |
| | हर्षल गाडे | ९८ |
| | रुचा कारखानिस | ९८ |
| | गौरीश नाडकर्णी | ९८ |
| | मालविका मुळे | ९८ |
| हिंदी | ओंकार होनमुखे | ८३ |
| मराठी | अक्षय भोसले | ८७ |
| | ओजस गोहाड | ८७ |
| | मालविका मुळे | ८७ |
| गणित | रुचा कारखानीस | १५० |
| विज्ञान | अक्षय भोसले | ९९ |
| | मनाली गजमल | ९९ |
| | रूचा गणपुले | ९९ |
| | अश्विनी पावगी | ९९ |
| | विराज सांघवी | ९९ |
| | वृत्तीका शाह | ९९ |
| | रुचा कारखानीस | ९९ |
| | अपूर्वा जोशी | ९९ |
| समाजशास्त्र | विराज सांघवी | ९८ |
| | रुचा कारखानिस | ९८ |

**संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल :**

ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेत खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.

१) मुस्तफा करी
२) प्रियांका बॅनर्जी
३) ऐश्वर्या ओक
४) अश्लेषा पोटदुखे
५) वृषाली प्रसादे

**पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल :**

फेब्रुवारी २००८ मध्ये आयोजित पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत निकाल ९४.२८% लागला.

खालील पाच विद्यार्थ्यांना शहरी विभागात शिष्यवृत्ती मिळाली.

१) कु. तक्ष सत्रा - ६ वा (ठाणे विभाग)
२) कु. समृद्धी पाटील - ८ वी (ठाणे विभाग)
३) कु. अमोघ गोखले - ९ वा (ठाणे विभाग)
४) कु. सिद्धी सांगलीकर - ९ वी (ठाणे विभाग)
५) कु. साकेत आगाशे - ११ वा (ठाणे विभाग)

**माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल :**

फेब्रुवारी २००८ रोजी आयोजित माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ६७ विद्यार्थी बसले होते.

त्यातील ११ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. त्यांची नावे खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्राची जैस्वाल | - ६ वी | - २६९ गुण |
| २) | अमित पाटणकर | - ७ वा | - २६८ गुण |
| ३) | प्रियज नाबर | - १४ वा | - २५९ गुण |
| ४) | हर्षाली भोसले | - १८ वी | - २५४ गुण |
| ५) | मिहीर मुसळे | - २२ वा | - २५० गुण |
| ६) | अदित्य गुणे | - २४ वा | - २४८ गुण |
| ७) | प्रणव सहस्त्रबुद्धे | - २५ वा | - २४७ गुण |
| ८) | पुष्कर ओक | - २५ वा | - २४७ गुण |
| ९) | स्वरूप पडाळकर | - २६ वा | - २४६ गुण |
| १०) | सुप्रिया पाटील | - २९ वी | - २४३ गुण |
| ११) | मिहीर कुलकर्णी | - ३२ वा | - २४० गुण |

**महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा निकाल :**

एप्रिल २००८ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत इ. ८ वी तील खालील विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले.

| नाव | इयत्ता |
|---|---|
| १. वृषाली प्रसादे | राज्यात ३ री |
| २. कृणाल चौधरी | जिल्ह्यात ३ रा |

**महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा निकाल :**

एप्रिल २००८ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत इ. ९ वी तील खालील विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले.

| नाव | इयत्ता |
|---|---|
| आदित्य रानडे | जिल्ह्यात ५ वा |

इ. ८ वी व ९ वी तील प्रमाणपत्र मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| इ. ८ वी | : | सुवर्धन अहिरराव |
| | | पुष्कर वेलणकर |
| इ. ९ वी | : | क्षितीजा जाधव |

**फेब्रुवारी २००८ टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल :**

| इयत्ता | ५ वी | ६ वी | ७ वी |
|---|---|---|---|
| परीक्षेला बसलेल्या विद्यार्थी | २५ | ११ | ०९ |
| प्राविण्यासह उत्तीर्ण | १० | ०२ | |
| प्रथम श्रेणीसह उत्तीर्ण | १५ | ०८ | ०४ |
| द्वितीय श्रेणीसह उत्तीर्ण | | ०१ | ०१ |
| अनुतीर्ण विद्यार्थी | | | ०४ |

**सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :**

| इ. | नाव | गुण |
|---|---|---|
| ५वी | विराज महाडीक | ९७ |
| ६ वी | जान्हवी दोशी | ९२ |
| ७ वी | प्राची जैस्वाल | ७५ |

**फेब्रु. २००८ टिळक विद्यापीठ संस्कृत परीक्षेचा निकाल :**

१००% निकाल

| | | द्वितीय परीक्षा | तृतीय परीक्षा |
|---|---|---|---|
| परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | : | ०९ | ११ |
| विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या | : | ०२ | ०१ |
| प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या | : | ०५ | १० |
| उत्तीर्ण श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या | : | ०२ | ०० |

**सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे इ. ७वी :**

| | नाव | गुण |
|---|---|---|
| द्वितीय परीक्षा | सुश्रुत ठोसर | ८९ |
| | शमिक गोगटे | ८७ |
| तृतीय परीक्षा | मैत्री सत्रा | ९२ |

## बा. ना. बांदेडकर विज्ञान महाविद्यालय

### उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा निकाल :

| | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|
| बसलेले विद्यार्थी | ४८४ | ९४.६०% |

| वर्ग | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|
| विशेष गुणवत्ता | १५२ | ३१.४०% |
| प्रथम श्रेणी | २१३ | ४४.००% |
| द्वितीय श्रेणी | ८६ | १७.७६% |
| उत्तीर्ण श्रेणी | ७ | १.४४% |
| अनुतीर्ण | २६ | ५% |

### कनिष्ठ महाविद्यालयातील प्रथम वर्ष :

| वर्ग | एकूण | नाव | टक्केवारी |
|---|---|---|---|
| प्रथम | ५५२ | शिंदे संदेश दिलीप | ९२.००% |
| द्वितीय | ५४९ | प्रधान सायली संजीव | ९१.५०% |
| तृतीय | ५४० | खैरनार सागर अशोक | ९०.००% |

### विषयवार तपशील :

| विषय | नाव | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | माहीमकर, आवृती | ८९ |
| मराठी | मोरे, सुभाष | ८८ |
| हिंदी | पगारे, प्रियांका | ८३ |
| संस्कृत | व्यापारी, मंदार | ९३ |
| गणित | प्रधान, सायली | ९९ |
| पदार्थ विज्ञान | शिंदे, सिद्धेश | ९८ |
| | गणमुखी, अश्विन | ९६ |
| रसायन शास्त्र | शिंदे, सिद्धेश | ९० |
| | शेख, नूरीन | ९२ |
| | आंब्रे, तृप्ती | ९६ |

**२००७-२००८ या वर्षाचा तृतीय वर्ष :** विज्ञान शाखेच्या निकालाचा तपशील

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | : | २६२ |
| अनुपस्थित विद्यार्थी | : | ४ |
| परीक्षेस बसलेले विद्यार्थी | : | २५८ |
| प्रथम वर्ग | : | १०२ (३९.५३%) |
| द्वितीय वर्ग | : | १०१ (३९.१५%) |
| उत्तीर्ण वर्ग | : | ६ (२.३२%) |
| अनुतीर्ण | : | ४८ (१९.००%) |
| निकाल राखीव | : | १ |
| निकालाची टक्केवारी | : | ८१.००% |

### प्रथम तीन विद्यार्थी :

| विषय | नाव | गुण |
|---|---|---|
| संख्याशास्त्र | कोकाटे, मिलींद | ७६४ |
| | अडकर, प्रणिता | ७४४ |
| गणित | बिराजदार, उमालाक्षी | ७४३ |

### विषयवार तपशील :

| विषय | प्रथम | द्वितीय | उत्तीण | अनुतीर्ण | राखीव | अनुपस्थित | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रसायनशास्त्र | ३८ | ५१ | १ | १३ | १ | १ | १०५ |
| पदार्थशास्त्र | ८ | १६ | ४ | २० | - | ३ | ५१ |
| वनस्पतीशास्त्र | ६ | २ | - | - | - | - | ८ |
| प्राणिशास्त्र | १८ | १२ | - | ७ | - | - | ३७ |
| गणित | १३ | १२ | १ | ३ | - | - | २९ |
| संख्याशास्त्र | १९ | ८ | - | ५ | - | - | ३२ |
| एकूण | १०२ | १०१ | ६ | ४८ | १ | ४ | २६२ |

### विषयात सर्व प्रथम :

| विषय | नाव | गुण |
|---|---|---|
| रसायनशास्त्र | रणवारे, स्वाती | ६३४ |
| पदार्थशास्त्र | सूर्यवंशी, माया | ६५० |
| गणित | बिराजदार, उमालक्षी | ७४३ |
| संख्याशास्त्र | कोलकते, मिलींद | ७६४ |

| | | |
|---|---|---|
| वनस्पतीशास्त्र | बडगुजर, पंकज | ६४४ |
| प्राणिशास्त्र | राणे, अभिषेक | ६८७ |

✦ बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या अकरावी बारावी प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा निकाल खालील प्रमाणे आहे.

**प्रथम वर्ष विज्ञान शाखा :**

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | - | २४८ |
| परीक्षेला उपस्थित विद्यार्थी | - | २३९ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | - | १८५ |
| अनुत्तीर्ण विद्यार्थी | - | ३९ |
| ए.टी.के.टी. सह उत्तीर्ण विद्यार्थी | - | २०८ |
| एकूण निकाल | - | ७७.४०% |
| ए.टी.के.टी. सह निकाल | - | ८७.०२% |

**द्वितीय वर्ष विज्ञान शाखा :**

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | - | २५९ |
| परीक्षेला उपस्थित विद्यार्थी | - | २५६ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | - | २३९ |
| अनुत्तीर्ण विद्यार्थी | - | ६ |
| ए.टी.के.टी. सह उत्तीर्ण विद्यार्थी | - | २४९ |
| एकूण निकाल | - | ९३.३५% |
| ए.टी.के.टी. सह निकाल | - | ९७.२६% |

**आकरावी :**

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | - | ४७४ |
| विशेष प्राविण्या सह उत्तीर्ण विद्यार्थी | - | ५१ |
| प्रथम श्रेणीसह उत्तीर्ण विद्यार्थी | - | २०६ |
| द्वितीय श्रेणीसह उत्तीर्ण विद्यार्थी | - | १८५ |
| तृतीय श्रेणीसह उत्तीर्ण विद्यार्थी | - | २४ |
| अनुत्तीर्ण विद्यार्थी | - | ८ |
| एकूण निकाल | - | ९७.२६% |

**बारावी :**

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | - | ४८४ |
| विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण विद्यार्थी | - | १५२ |
| प्रथम श्रेणीसह उत्तीर्ण विद्यार्थी | - | २१३ |
| द्वितीय श्रेणीसह उत्तीर्ण विद्यार्थी | - | ८६ |
| तृतीय श्रेणीसह उत्तीर्ण विद्यार्थी | - | ७ |
| अनुत्तीर्ण विद्यार्थी | - | २६ |
| एकूण निकाल | - | ९४.६०% |

**एकूण निकाल :**

| | विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणी | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|---|
| प्रथम वर्ष विज्ञान शाखा | २२ | ४५ | ११३ | ५ |
| द्वितीय वर्ष विज्ञान शाखा | ६२ | ७१ | २०६ | २१३ |
| अकरावी | ५१ | २०६ | १८५ | ८६ |
| बारावी | १५२ | २१३ | ८६ | ७ |

**महाविद्यालयातील प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी:**

**प्रथम वर्ष विज्ञान शाखा :**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | : | निशिगंधा शिवाजी कुहाडे |
| द्वितीय | : | हीना मोहम्मद अन्सारी |
| तृतीय | : | पूजा मनोहर पडयल |

**द्वितीय वर्ष विज्ञान शाखा :**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | : | अश्विनी अशोक कान्हुरकर |
| द्वितीय | : | अनाहिता गोदरेज तारापूरवाला |
| तृतीय | : | अजिंक्य शशिकांत वाकनिस |

**अकरावी :**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | : | सुशांत दयानंद म्हात्रे |
| द्वितीय | : | अभिलाषा रामदूलार यादव |
| तृतीय | : | प्रांजली मिलिंद नाईक |

**बारावी :**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | : | सिद्धेश दिलिप शिंदे |

| | | |
|---|---|---|
| द्वितीय | : | सायली संजीव प्रधान |
| तृतीय | : | सागर अशोक खिरनार |

**वृत्तांत लेखन –** कादंबरी कादरेकर

## डॉ.वा.ना बेडेकर व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था

**Dr. VNBRIMS ग्रंथालयाची Skype Online Reference Service :**

आधुनिक तंत्रज्ञानाचा तसेच इंटरनेटचा वापर करून वाचकांसाठी नवनवीन सेवा - सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असलेल्या आमच्या ग्रंथालयातर्फे Skype Online Reference Service या आणखी एका संदर्भ सेवेची सुरुवात करण्यात आली आहे.

Skype हे सॉफ्टवेअर वापरून पुरविण्यात येणाऱ्या या सेवेमध्ये इंटरनेटच्या माध्यमातून वाचक आमच्या ग्रंथालयाशी त्यांच्या Skype अकाउंट वरून Call, Vidco call किंवा message करून थेट संपर्क साधू शकतात. ही सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध आहे.

सकाळी ७.०० ते रात्री ११.०० या वेळेत (सर्व कामकाजाचे दिवस) drvnbrimsLibray या Skype ID वर वाचक आपले ग्रंथालय तसेच ग्रंथालय साहित्य संदर्भातील त्यांचे प्रश्न, माहिती ग्रंथालय कर्मचाऱ्यांना थेट विचारू शकतात. ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या २५ लाखांपेक्षा जास्त किंमतीच्या Databases चा अधिकाधिक उपयोग शिक्षक तसेच विद्यार्थ्यांना व्हावा हा या सेवेचा प्रमुख उद्देश आहे.

Skype संदर्भात अधिक माहिती http://www.skype.com/intl/en/useskype/ या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**वृत्त संकलन –** ग्रंथालय विभाग

## वि. प्र. मं. चे तंत्रनिकेतन

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (मुंबई उप-प्रादेशिक) आयोजित ‘cyber security’ या विषयावर एका प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. १ ते २ जुलै, दरम्यान वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनमध्ये केले होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनी केले. प्रशिक्षण कार्यक्रमाला विविध शासकीय तंत्रनिकेतनातील प्रतिनिधी हजर होते. सायबर गुन्हा या विषयीचा शोध कसा घ्यावा याविषयीची प्रात्यक्षिकांसह माहिती दिली गेली. शिवाय अनेक प्रकारचे सायबर गुन्हे web site वरून कसे तपासावेत. त्याची सुरक्षितता कशी ठेवावी इत्यादी विषयी माहिती उपस्थितांना करून देण्यात आली.

या विषयाचा प्रशिक्षण कार्यक्रम MSBTE च्या सहकार्याने आयोजित केला गेला.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या A.V. (दृक्‌श्राव्य कक्ष) रूम BLdg No. ३ मध्ये पार पडला. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे संघटन सचिव म्हणून प्रा. सौ. एस. के. शुक्ला यांनी काम पाहिले.

**वृत्त संकलन :** चंद्रकांत शिंगाडे

●●●

*अजब कहाण्या शोधांच्या*

***मेकॅनो***

अनेक ठोकळे एकावर एक रचून वेगवेगळे आकार तयार करण्याचा मेकॅनो हा खेळ १९०१ मध्ये शोधून काढण्याचे श्रेय ब्रिटिश खेळ-संशोधक फ्रँक हॉर्नबी याजकडे जाते. मुलांच्या कल्पनाशक्तीला खाद्य पुरवणारा हा खेळ जगभरच्या मुलांना घरबसल्या खेळता येतो.

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

**• विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था •**

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्राथमिक विभाग)

२) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)

३) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (प्राथमिक विभाग)

४) सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (माध्यमिक विभाग)

५) के. ग. जोशी कला महाविद्यालय व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय

६) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

७) वि. प्र. मंडळाचे टी. एम्. सी. विधी महाविद्यालय

८) डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था

९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

१०) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान संस्था

११) वि. प्र. मंडळाचे प्रगत अभ्यास केंद्र

**उपक्रम**

भावे व्याख्यानमाला

व्ही.पी.एम्. दिशा

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


## विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

✰ ३०० आसनांची व्यवस्था

✰ आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा

✰ उपाहाराची व्यवस्था

✰ वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

✰ प्रसन्न वातावरण

संपर्क

कार्यवाह,

विद्या प्रसारक मंडळ,

नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

**दूरध्वनी : २५४२ ६२७०**


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.